नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १८ * * अकोला * शुक्रवार, दिनांक १८ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल

■ वृत्तसंस्था, गुडगाव, दि. १७ :
हरियाणातील गुरुग्राम येथील जमीन व्यवहार प्रकरणात, अंमलबजावणी संचालनालयान उद्योगपती आणि कॉंग्रेस खासदार प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. जमीन व्यवहाराशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात हे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध फौजदारी प्रकरणात कोणत्याही तपास संस्थेने आरोपपत्र दाखल करण्याची ही पहिलीच वेळ आहे. वाड्रांव्यतिरिक्त, आरोपपत्रात इतर अनेक लोक आणि कंपन्यांची नावे देखील समाविष्ट आहेत. हे प्रकरण सप्टेंबर २००८ चे आहे. जे गुरुग्राममधील शिकोहपूर (आता सेक्टर ८३) च्या जमीन व्यवहाराशी संबंधित आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## गुद्देबाजीचे प्रांगण

आपल्या महाराष्ट्राचे कायदे करणारे आपले एक विधिमंडळ आहे. आपले विधिमंडळ ज्या ठिकाणी आहे तिथे राज्यातील कायदे विषयक चर्चा होऊन ते कायदे संमत होत असतात. त्या ठिकाणी कायद्याची भाषा सोडून हल्ले लङ्खालङ्खी सुरू झालेली आहे. ही बाब महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिंबा लावणारी आहे. आमचे लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या भरवशांवर चालणाऱ्या त्यांच्या भक्तांना किंवा पित्त्यांना सध्याच्या घडीला काय झाले आहे तेच समजत नाही. जुन्या काळाचे गोडवे गात बसू नये असे म्हणतात. आमच्या काळात असे होते आमच्या काळात तसे होते तसेच आता असे आहे पूर्वी कसे होते. या सर्व भानगडी मध्ये न पडलेले बरे असते, पण असे काही प्रकार पाहिले म्हणजे आपल्या विधी मंडळातील बड्या बड्या नेत्यांची अभ्यासपूर्ण भाषणे विरोधी पक्षांनी केलेली भयंकर टोलेबाजी, एक दुसऱ्याचे काढलेले वाभाडे हे सर्व प्रकार यापूर्वीच्या विधानसभेने पाहिलेले आहेत, अनुभवलेले आहेत. एकेका विषयाची चिरफाड करून सरकारला जेरीस आणणारे अमोघ वक्ते आणि बुद्धिजीवी मंडळी विधानसभा किंवा विधान भवनाच्या गृहाबाहेर आल्यावर अत्यंत खेळीमेळीने चहापान करीत होते, समस्यांची सोडवणूक कशी केली जाईल, याविषयी चर्चा करीत होते. हे आज जर कुणाला सांगितले तर ते खरे वाटणार नाही. आता सिद्धांत आणि शाब्दिक हल्ले तिजोरीत बंद झालेले आहेत. कारण पूर्वीच्या मंत्री आणि आमदारांकडे तिजोरी नसायची. त्यामुळे त्यांच्याकडे तेवढी मुजोरी नसायची. महाराष्ट्राचे अनेक वर्ष मंत्री आणि मुख्यमंत्री राहिलेले माननीय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सोडून संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेले त्यानंतर मा. सा. कन्नमवार यांच्याकडे मुख्यमंत्री पद आले, ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर त्यांचे निधन झाल्यावर कन्नमवार यांच्या कुटुंबांची अवस्था कशी होती ते तुम्हाला सांगितले तर खरे वाटणार नाही. कारण त्यांचे कुटुंब त्यांच्या निधनानंतर भाड्याच्या घरात राहत होते. त्यावेळी आमदारांकडे दरवर्षी पाच पाच कोटी रुपयांचा निधी विकास कामासाठी मिळत नव्हता. त्यांचा पगार किंवा भत्ते आजच्या तुलनेत पाच टक्केही नव्हते. अनेक आमदार प्रवास करण्यासाठी राष्ट्रीय परिवहन महामार्गाच्या गाडीचा म्हणजेच परिवहन महामंडळाच्या बसचा वापर करीत असत. त्या बसमध्ये आमदारांसाठी दोन जागा राखीव असत. हीच काय ती जबरदस्त सवलत होती. महाराष्ट्रभर अनेक आमदार त्या बसमधून त्या काळी फिरत होते. आता आमदार झाल्याबरोबर आमदारांच्या दारी लाखो रुपये किमतीच्या गाड्या अवघ्या महिन्यात ते दोन महिन्यात उभ्या राहतात. हे इतके वर्णन करण्याचे कारण तेव्हाचे आमदार आर्थिक दृष्टीने श्रीमंत नसले तरी विद्वत्ता, आचरण आणि जनमानसांची सेवा करण्याची सेवा वृत्ती याबाबतीत हे सर्व निश्चितच पुढारी म्हणून शोभत असत. काही अपवाद वगळता ते जनतेचे सेवकच होते. तेव्हा बहुसंख्य सेवक होते आता सेवक असलेले लोकप्रतिनिधी अपवादात्मक सेवक असतात. गणपतराव देशमुख सुद्धा मंत्री होते त्यावेळी त्यांचे सरकार बरखास्त झाले आणि त्यांना हे कळताच त्यांनी आपली सरकारी गाडी लगेच परत केली. त्यानंतर नेहमीप्रमाणे बसने प्रवास केला, आत्ताचे विधिमंडळातील दर्शन नयनमनोहर नाही तर अत्यंत भपकेबाजीचे आहे, प्रदर्शनाचे आहे. हीच खरी आजकालची कैफियत आहे, नाइलाजाने दरवर्षी एक अधिवेशन नागपूरला होते. त्यावेळी आमदारांसाठी राखीव असलेल्या खोलीत राहणे म्हणजे बहुसंख्य आमदारांना अत्यंत अपमानास्पद वाटते. या अधिवेशनाच्या काळात नागपुरात दररोज हजारो रुपये मोजून भाड्याने मिळणाऱ्या हॉटेलच्या खोलीची किल्ली प्रत्येक आमदाराजवळ असते आणि अनेक आमदारांना मिळालेल्या शासकीय खोलीत त्यांचे भक्तगण आणि पित्ते मस्तपैकी या आमदारांचा जयजयकार करून बऱ्याच गोष्टी करीत असतात. आज विधिमंडळाच्या लॉबीमध्ये म्हणजेच विधान भवनामध्ये असेच जयजयकारी भक्तगण मुद्द्यावरून गुद्द्यांवर आले. कारण त्यांना किंवा त्यांच्या नेत्याला मुद्देच माहीत नसतात आणि ते माहीत नसल्यामुळे समोरच्या मंडळींना गुद्दे मारणे हेच आपले मुद्दे आहेत, असे समजून कार्यकर्तेही आपल्या गदा जोरजोरात गदागदा फिरवीत असतात. आज कोणी कोणावर हात उचलला, कोणाची चूक होती, कोणी कोणाला कसे मारले आणि कोणी कोणाला कशा शिव्या दिल्या किंवा आणखी कायकाय प्रकार केले. याच्याशी आम्हाला काहीच देणे घेणे नाही कारण आता विकृतीच आपली संस्कृती झाली आहे, हे अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते. सभ्य माणसाने आता या सर्व गोष्टींचा विचारही करू नये असे दिवस आलेले आहेत त्यामुळे सध्या गुद्देबाजांचा विजय असतो. तो झाला असेलच, त्यामुळेच या गुद्धेबाजीच्या प्रांगणात गुद्देबाजांचा जिंदाबाद! सरतेशेवटी, कालाय तस्मैय नमः!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# लॉबीमध्ये हाणामारी

### आव्हाड, पडळकर यांचे कार्यकर्ते भिडले ■ राहुल नार्वेकरांनी मागितला अहवाल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील वादाचे आज विधानभवन परिसरात तीव्र पडसाद उमटले.

या दोन्ही नेत्यांचे समर्थक आज सायंकाळी थेट विधानभवनाच्या लॉबीत एकमेकांना भिडले. यावेळी त्यांच्यात तुंबळ हाणामारी झाली.



या अचानक घडलेल्या प्रसंगामुळे विधिमंडळाच्या लॉबीत असणाऱ्या आमदारांत एकच घबराट पसरली. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत घटनेचा अहवाल मागवला आहे. यामुळे विधानभवनातील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोर' अशी घोषणाबाजी केली होती. यामुळे पडळकर चांगलेच संतापले होते. या घटनेला ५ दिवस लोटत नाहीत तोच बुधवारी विधान भवनाच्या गेटवर या दोन्ही नेत्यांत चांगलीच बाचाबाची झाली.

त्यानंतर आज पडळकरांच्या एका समर्थकाने आव्हाड यांना मारण्याची धमकी दिली. या घटनेचे आज विधानभवनाच्या लॉबीत तीव्र पडसाद उमटले. या दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते आज विधानभवनाच्या लॉबीत भिडले. त्यांच्यात कपडे फाटेपर्यंत जोरदार हाणामारी झाली.

अचानक झालेल्या या प्रसंगामुळे तिथे उपस्थित असणारे आमदार व पत्रकारांत एकच खळबळ माजली. हे सर्वजण सुरक्षित ठिकाणी धावताना दिसून आले. या घटनेत आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना मारहाण झाल्याची माहिती आहे.

## ....तर कशाला राहायचे आमदार?

हे लोकं मलाच मारायला आले होते, विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आमदार सुरक्षित नसतील, तर कशाला राहायचे आमदार? काय गुन्हा आहे आमचा? कुणीतरी मवाल्यासारखा येतो आमच्या आई-बहिणींवर शिव्या देतो. त्याला ऑफिशिअल लँग्वेज म्हणून घोषित करा. असंसदीय शब्द वापरले जातात. त्यालाच आता संसदीय शब्द म्हणून घोषित करा. सत्तेचा एवढा माज, असा तीव्र संताप आव्हाड आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.



या प्रकरणी उद्धव ठाकरे यांनीही या प्रकरणी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. हाणामारी करणारे समर्थक होते का गुंड होते? येथे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल तर विधानभवनाला अर्थ काय? ज्यांनी या लोकांना पास दिले त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

## पडळकरांचे मौन अन् दिलगिरी

या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांना छेडले असता त्यांनी आपला या घटनेशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. तसेच जितेंद्र आव्हाड यांना धमकी देणाऱ्या व्यक्तीला आपण ओळखत नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तथापि, विरोधी आमदारांनी मुद्दा उपस्थित केला, विधानसभा अध्यक्षांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतल्यानंतर गोपिचंद पडळकर यांनी दिलगिरी व्यक्त केली.

## ठाकरे, फडणवीसांमध्ये गुफ्तगू...



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांनी भेट घेतली. सध्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. या अधिवेशनामध्ये आदित्य ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगर विकास खात्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील जोरदार प्रहार केला. त्यानंतर शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना सभागृहात देखील पाहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी ही भेट घेतली असल्याचे मानले जात आहे.

विधान परिषदेमध्ये काल विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेळीमेळीच्या वातावरणात उद्धव ठाकरे यांना सरकारमध्ये सामील होण्याची ऑफर दिली होती.

या ऑफर नंतर आज शिवसेना विरुद्ध शिवसेना यांच्यात चांगलीच चकमक पाहायला मिळाली. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची ही भेट असल्याचे मानले जात आहे.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनामध्ये ही बैठक झाली. या दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाली. त्रिभाषा सुत्र, विरोधी पक्ष नेते पद यांच्यासह काही महत्त्वाच्या विषयांवर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याचे समजते.

## मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणणार!

### एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :



मुंबई महानगरातील सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासूनचे अडथळे दूर करीत मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत.

याशिवाय महायुती सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबईतील नागरिकांच्या जीवनात आमुलाग्र बदल होईल. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागातील आवश्यक त्या सुधारणांमुळे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होतील तसेच झोपडपट्टीमुक्त मुंबईच्या दिशेने वाटचाल होईल, अशी ठाम ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.

## वाढदिवस जीवावर बेतला

# ७ ठार, २ गंभीर

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १७ :
दिंडोरी कळवण रस्त्यावरील संस्कृती लॉनच्या समोर झालेल्या अपघातात सात जण ठार झाले आहे. अपघातामधील मृतांमध्ये तीन महिला, तीन पुरुष तसेच लहान बालकांचा देखील समावेश आहे. मोटरसायकल आणि अल्टो कार यांच्यात हा अपघात झाल्याची माहिती आहे.



बुधवारी मध्यरात्री ११:३० च्या सुमारास मोटरसायकल आणि अल्टो कारचा अपघात झाला असून अल्टो कार मधील सात प्रवासी ठार झाले. तर मोटरसायकल चालवणारे मंगेश कुरघडे (वय २५), अजय जगन्नाथ गोंद (वय १८), रा. नडगे गोट, ता. जव्हार, जि.पालघर सध्या राहणार सातपूर गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना नाशिक येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार अपघातामध्ये मृत्यू पावलेले सर्वजण हे नाशिक येथे त्यांच्या नातेवाईकांच्या मुलाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम संपल्यानंतर ते परत गावाकडे जात असताना हा अपघात झाला.

यामध्ये धडकेनंतर अल्टो कार रस्त्याच्या लगत असलेल्या नाल्यात उलटली. कारमध्ये असलेल्या प्रवाशांना बाहेर पडता आले नाही. त्यामुळे कारमध्ये पाणी भरले आणि ते प्रवाशांच्या नाका तोंडात गेल्याने त्यांना श्वास घेता आला नाही. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला आहे.

मृतकांमध्ये देविदास गांगुर्डे, (वय २८), मनीषा देविदास गांगुर्डे, (वय २३), उत्तम एकनाथ जाधव, (वय ४२), अल्का उत्तम जाधव (वय ३८), दत्तात्रय नामदेव वाघमारे, (वय ४५), अनसूया दत्तात्रय वाघमारे (वय ४०), भावेश देविदास गांगुर्डे (वय २) यांचा समावेश आहे. सर्व मृतक नाशिक जिल्ह्यातील रहिवासी होते.

मृतांचे शवविच्छेदन दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. मृत हे कोशिंबे देवठाण व सारसाळे येथील रहिवासी आहेत. दिंडोरी पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पुढील तपास पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांच्या मार्गदर्शना खाली सुरु असून दिंडोरी पोलिस ठाण्यात अपघाताची माहितीची नोंद करण्यात आली आहे.

## जबरदस्तीने कोणाचेही धर्मांतरण नको

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
सर्वोच्च न्यायालयाने जो काही निर्णय दिला आहे, त्या निर्णयाच्या अनुषंगाने, इतर धर्मियांनी खोटे कागदपत्र देऊन शेड्यूल कास्टचे आरक्षण घेतले असेल तर त्यांचे कास्ट सर्टिफिकेट रद्द करण्यात येईल. कोणी खोटे सर्टिफिकेट दाखवून सरकारी नोकरी करत असेल तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल, कोणी खोटे कागदपत्र दाखवून निवडणूक लढवली असेल तर त्यावर देखील कारवाई केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.



तसेच कोणाचेही जबरदस्तीने धर्मांतरन करता येणार नाही याची तरतूद करू, असे आश्वासन देखील त्यांनी दिले आहे.

## इंडिया आघाडीची बैठक १९ ला

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १७ :
लोकसभा निवडणूक २०२४ नंतर दुसऱ्यांदा, इंडिया अलायन्सचे नेते १९ जुलै (शनिवार) संध्याकाळी भेटणार आहेत. तृणमूल कॉंग्रेस आणि आम आदमी पार्टी (आप) त्यात सहभागी होणार नाहीत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्यासह अनेक नेत्यांशी चर्चा केली आहे. कॉंग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या घरी होणाऱ्या या बैठकीसाठी सर्व पक्षांच्या नेत्यांना आमंत्रित केले आहे.

ही बैठक अशा वेळी होत आहे जेव्हा पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे आणि मतदार यादीच्या विशेष सुधारणा प्रक्रियेवरून बिहारमध्ये गोंधळ सुरू आहे. आघाडीची शेवटची बैठक या वर्षी ३ जून रोजी झाली होती. यामध्ये केंद्र सरकारकडून 'ऑपरेशन सिंदूर' वर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी करण्यात आली होती. यापूर्वी ५ जून २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीसंदर्भात बैठक झाली होती.

तृणमूल कॉंग्रेस २१ जुलै रोजी 'शहीद दिवस' साजरा करत आहे, त्यामुळे त्यांचे नेते कोलकात्यात व्यस्त असतील. दरम्यान, 'आप' गुजरात आणि इतर राज्यांमध्ये त्यांच्या विस्तार मोहिमेत व्यस्त आहे.

## हातात भोपळा घेऊन विरोधकांचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
पावसाळी अधिवेशनातून राज्यातील जनतेला काय मिळाले? या प्रश्नावर विरोधकांनी आज सरकारवर जोरदार हल्लाबोल करत भोपळा सरकार अशी टीका केली.

शेतकरी कर्जमाफीपासून ते आदिवासी समाजाच्या मागण्यांपर्यंत, आरोग्य विभागाच्या समस्यांपासून ते विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तींपर्यंत सर्वच प्रश्नांना उत्तर देण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोप करत विरोधकांनी हातात भोपळा घेऊन विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले.

कशाला मिळाला भोपळा? शेतकरी कर्जमाफी भोपळा, आदिवासी समाजाच्या मागण्या भोपळा, आरोग्य विभागातील भरती, सुविधा भोपळा, विद्यार्थ्यांचे प्रश्न, शिक्षकांची भरती भोपळा, आशा वर्कर, गिरणी कामगारांचे प्रश्न भोपळा... अशा घोषणां देत विरोधकांनी सरकारचा खरपूस समाचार घेतला.

## शुभांशूंनी मारली पत्नीला मिठी

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १७ :
१८ दिवस अंतराळात राहून पृथ्वीवर परतलेले लखनौचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला बुधवारी त्यांची पत्नी कामना आणि ६ वर्षांचा मुलगा कियाश यांना भेटले. शुभांशूंनी त्यांच्या पत्नीला मिठी मारली आणि मुलाला आपल्या कडेवर घेतले.

फोटो शेअर करताना शुभांशूंनी इंस्टाग्रामवर लिहिले - अंतराळ उड्डाण अद्भुत आहे, पण बऱ्याच काळानंतर प्रियजनांना भेटणे देखील तितकेच आश्चर्यकारक आहे. जेव्हा मी पृथ्वीवर परतलो आणि माझ्या कुटुंबाला मिठी मारली तेव्हा मला असे वाटले की मी घरी आलो आहे.



शुभांशूंनी पोस्टद्वारे सांगितले की, अंतराळात जाण्यापूर्वी, त्यांना २ महिने क्वारंटाईनमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांना कुटुंबापासून ८ मीटर अंतर राखावे लागले. माझ्या धाकट्या मुलाला सांगण्यात आले होते की त्याच्या हातात जंतू असू शकतात, म्हणून तो बाबांना स्पर्श करू शकत नाही. प्रत्येक वेळी तो त्याच्या आईला निरागसपणे विचारायचा, 'हात धुतल्यानंतर मी आता बाबांना स्पर्श करू शकतो का?' वास्तविक, अंतराळवीरांना अंतराळ स्थानकात जाण्यापूर्वी क्वारंटाइन केले जाते जेणेकरून कोणतेही जंतू आयएसएसपर्यंत पोहोचू नयेत. शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर २५ जून रोजी ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकासाठी रवाना झाले. २६ जून रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ४:०१ वाजता आयएसएसवर पोहोचले. १८ दिवस तिथे राहिल्यानंतर, १५ जुलै रोजी पृथ्वीवर सुखरूप परतले.

# ब्रिटनमध्ये मतदानाचे किमान वय १६ वर्षे

### ४५ वर्षांनंतर निवडणूक व्यवस्थेत बदल ■ परकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी बदलले नियम

■ वृत्तसंस्था, लंडन, दि. १७ :
यूके सरकारने जाहीर केले आहे की आता देशभरात १६ आणि १७ वर्षांच्या मुलांना मतदानाचा अधिकार असेल. पुढील सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी हा निर्णय लागू केला जाईल.

ब्रिटनमध्ये मतदानाच्या वयात शेवटचा बदल १९६९ मध्ये झाला होता, जेव्हा तो २१ वरून १८ वर्षांपर्यंत कमी करण्यात आला होता. अशा परिस्थितीत, हा बदल गेल्या ५६ वर्षांतील निवडणूक व्यवस्थेतील मोठी सुधारणा मानली जात आहे.

पूर्वी हे तरुण फक्त स्कॉटलंड आणि वेल्समधील काही निवडणुकांमध्ये मतदान करू शकत होते, परंतु आता ते संपूर्ण यूकेमधील स्थानिक, प्रादेशिक आणि सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भाग घेऊ शकतील.




निवडणुकीत परकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी नियम कडक करत असल्याचे सरकारने म्हटले आहे. आता राजकीय देणग्या देणाऱ्या कंपन्यांना हे सिद्ध करावे लागेल की त्यांचा ब्रिटन किंवा आयर्लंडशी संबंध आहे आणि तेथून त्यांना उत्पन्न मिळते.

आतापर्यंत कोणतीही ब्रिटिश कंपनी कोणत्याही राजकीय पक्षाला देणगी देऊ शकत होती, मग ती कंपनी कुठेही असो आणि तिचा मालक कोण असो. आता जर एखाद्याला 'शेल कंपनी' द्वारे राजकीय पक्षाला देणगी द्यायची असेल तर त्याला कठोर नियमांचे पालन करावे लागेल.

आता ५०० पौंडापेक्षा जास्त (सुमारे ५८ हजार रुपये) देणग्यांची काटेकोरपणे तपासणी केली जाईल. निवडणूक आयोगाला आता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना ५ लाख पौंडांपर्यंत दंड आकारण्याचा अधिकार असेल.

सरकार असेही म्हणते की तरुणांना न्याय देण्यासाठी आणि लोकशाहीमध्ये त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे, विशेषतः जे तरुण सैन्यात सेवा देत आहेत किंवा देशाची सेवा करण्यास तयार आहेत त्यांच्यासाठी. याशिवाय, सरकारचा असा विश्वास आहे की यामुळे देशाच्या निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पुनर्संचयित होण्यास मदत होईल. गेल्या वर्षी निवडणुकीपूर्वी कामगार पक्षाने त्यांच्या जाहीरनाम्यात दिलेले वचन देखील या निर्णयामुळे पूर्ण होते. या बदलाचा ९५ लाख लोकांना फायदा होईल, असा सरकारचा विश्वास आहे.



# विधीमंडळ अधिवेशन

# ...तर अनेकांचा मोरया होईल!

## एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत नियम २९३ अन्वये सुरू असलेल्या चर्चेला उत्तर दिले. यात त्यांनी मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासह इतर मुद्यांवरून विरोधकांना विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला चांगलेच खडेबोल सुनावले.

मतदानाच्या आधी मराठी - मराठी म्हणायचे आणि निवडून आल्यानंतर कोण रे तू म्हणायचे, असा प्रकार सध्या सुरू आहे, असे ते म्हणाले. डिनो मोरियाने मिठी नदी घोटाळ्याप्रकरणी तोंड उघडले तर अनेकांचा मोरया होईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

एकनाथ शिंदे आपल्या उत्तरात म्हणाले, धारावी पुनर्विकासाचा देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. तेथील १ लाख ४० हजार झोपड्यांचे सर्वेक्षण झाले आहे. सद्यस्थितीत तेथील लोक अत्यंत वाईट स्थितीत राहतात. ते माणसे नाहीत का?

या प्रकरणी सरकारवर बिल्डरच्या घशात जागा घातल्याचे आरोप होतात. ही जागा कुणाच्याही घशात घाली नाही तर डीआरपीला (धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट) दिली आहे. त्यात सरकार भागिदार आहे. त्यामुळे आपण सर्वकाही अदानींनी देतोय ही वस्तुस्थिती नाही. तेथील लोकांनाही हा प्रकल्प हवा आहे.



कॉंक्रिटचे रस्ते झाल्यानंतर त्यावर २५ वर्षे दुरुस्तीचा खर्च नाही. दरवर्षी दुरुस्ती करून काळ्याचे पांढरे करून दुरुस्तीच्या नावाने पैसे काढण्याचे काम कोण करत होते? आम्ही डीप क्लीन ड्राईव्हने रस्ते धुवायला गेलो. तुमच्या लोकांनी तर त्याच्या तिजोऱ्या धुतल्या आतापर्यंत. बोलायला आम्हालाही येते. मिठी नदीतील गाळ कोण काढतंय? त्यांना मराठी माणूस दिसला नाही. तो डिनो मोरिया दिसला. आता त्या मोरियाने तोंड उघडले तर कितीतरी लोकांचा मोरया होईल. म्हणून जे काचेच्या घरात राहतात, ते दुसऱ्यांच्या घरावर दगड मारत नाहीत, असे शिंदे म्हणाले

आपण का त्याला विरोध करायचा?

**बिल्डरसोबत कुणाचे साटेलोटे?**

आपल्याला मोठेमोठे बंगले पाहिजे. चांगली घरे पाहिजे आणि त्यांनी त्याच स्थितीत खितपत पडायचे का? तिथे चांगली घरे झाली तर तेथील जनतेचे जीवनमान उंचावेल. विरोधकांनी या नागरिकांचे जीवनमान पहावे व नंतर विरोध करावा. बिल्डरसोबत साटेलोटे झालेले कुणाचे आहेत? असे शिंदे म्हणाले.

त्यांच्या या विधानावर सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी वन्स मोअरची मागणी केली. पण शिंदे आकाशवाणी एकदाच होते असे म्हणत विषय पुढे सरकवला. ते म्हणाले, स्वार्थाचा झेंडा व सत्तेचा झेंडा राबवयाचा हेच यांना (विरोधक) माहिती आहे.

विजयराव (विजय वडेट्टीवार) मी तुमच्याविषयी बोलत नाही. तुम्ही समजदार आहात. ही पोरंटोरं बोलली तर समजू शकतो. पण तुम्ही विरोधी पक्षनेते व मंत्री राहिला आहात. त्यामुळे तुम्ही खोटेनाटे बोलणे सोडले पाहिजे. अरे विकासाला चालना द्या. विकासविरोधी निर्णय घेणारे कोण आहेत. आम्ही सरकारमध्ये येण्यापूर्वी मुंबई व महाराष्ट्रातील सर्व प्रकल्प बंद होते. आम्ही त्यांना चालना दिली, असे शिंदे म्हणाले.

कोविडमध्ये खिचडी चोरणारे, डेडबॉडी बॅग चोरणारे कुणावर आरोप करता? जिथे डॉक्टर व पेशंट नाहीत तेथूनही या लोकांनी पैसे काढले. रस्ते बनवणारा कंत्राटदार, कपड्याचा व्यापारी त्याला कोविड सेंटर दिले. कुणावर आरोप करता भ्रष्टाचाराचे? असेही ते यावेळी ठाकरे गटावर टीका करताना म्हणाले. दरम्यान, यावेळी सभागृहात विरोधी बाकांवरील सदस्यांमध्ये मोठीच कुजबूज सुरू होती.

## मंत्रालय, नाशिक, ठाणे हनीट्रॅपचे केंद्र

### पटोलेंनी दाखवला सभागृहात पेनड्राईव्ह

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ : राज्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना हनीट्रॅपमध्ये अडकवून त्यांच्याकडून खंडणी उकळण्याच्या घटनेमुळे सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ माजली आहे.



कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी गुरूवारी सलग दुसऱ्यांदा हा विषय हा विषय विधानसभेच्या पटलावर मांडला. तसेच या प्रकरणी सभागृहाच्या अध्यक्षांनी निर्देश दिल्यानंतरही सरकार स्पष्टीकरण देत नसल्याचा आरोप केला. दरम्यान, राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी पटोले म्हणतात तसे काही घडलेच नसल्याचा दावा करत आपल्या तोंडावर बोट ठेवले आहे.

नाना पटोले गुरूवारी सभागृहात बोलताना म्हणाले, विधानसभा अध्यक्षांनी सरकारला निवेदन करण्याचे सांगितले. पण त्यांच्या सूचनेनंतरही सरकार त्यावर निवेदन करत नाही आणि उभे राहून उत्तरही देत नाही. या प्रकरणी महाराष्ट्राची बदनामी होत आहे. मंत्रालय, नाशिक व ठाणे हे हनीट्रॅपचे केंद्र बनले आहे. राज्याचे महत्त्वाचे दस्तऐवज या समाजविघातक संघटनाच्या हाती जात आहेत. मी कुणाचेही चारित्र्यहनन करत नाही. माझ्याकडे पेन ड्राईव्ह आहे. ते दाखवायचे नाही. पण गंभीर प्रकरणात सरकार निवेदन करण्यास तयार नाही.

सरकारच्यावतीने अध्यक्षांचा अपमान करण्याचा प्रयत्न होत असेल तर विरोधक म्हणून आम्ही ते सहन करणार नाही. हा अतिशय गंभीर व ज्वलंत प्रश्न आहे. मी परवा निकृष्ट दर्जाच्या तांदळाचा प्रश्न उपस्थित केला. तुम्ही दस्तऐवज मागितले. आम्ही त्याची सरकारकडे विचारणा केली. पण अद्याप ते दस्तऐवज मिळाले नाहीत. सरकार अधिवेशन संपल्यानंतर ते देणार आहे का? असा सवालही पटोलेंनी यावेळी उपस्थित केला.

नाना पटोले यांच्या या विधानानंतर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सरकारला उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी सरकारला सभागृहात उपस्थित करण्यात आलेल्या सर्वच मुद्यांवर स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले.

याचवेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनीही या चर्चेत हस्तक्षेप केला.

## खटाव मिलमध्ये मिल कामगारांसाठी घरे



**मुंबई :** गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासाठी खटाव मिलमध्ये घरे बांधण्याचे प्रस्तावित आहे. सुमारे १ हजार नव्या घरांचा प्रश्न मिटेल, असा दावा मंत्री उदय सामंत यांनी केला. तसेच नवीन डीसीपीआर, शासन नियमावलीनुसार आतापर्यंत १३ हजार ५०० बांधली असून उर्वरित काम सुरू असल्याचे ते म्हणाले.

शिवसेना (ठाकरे) आमदार सचिन अहिर यांनी यासंदर्भात परिषदेत लक्षवेधी मांडली. लक्षवेधी प्रश्नावर सामंत यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, मुंबईतील गिरणी जमिनीसंदर्भात २०१९पासून लागू असलेल्या नियमावलीनुसार (कलम ५८) आणि नवीन डीसीपीआर (कलम ३५) अंतर्गत, गिरणीच्या जागेचे तीन सम भाग करून त्यातील एक तृतीयांश (वन थर्ड) जमीन महापालिकेला बगीचे व क्रीडांगणासाठी, एक तृतीयांश गिरणी कामगारांच्या घरांसाठी आणि उर्वरित भाग मालकासाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या नियमाची मुंबईत अंमलबजावणी सुरू आहे. त्यानुसार खटाव मिलची १० हजार २२८.६९ चौरस मीटर जमीन मुंबई महापालिकेला मिळणार आहे. तितकीच जमीन गिरणी कामगारांच्या घरांसाठी वापरली जाईल. या जागेतून ९०० ते १ हजार नवीन घरे उभारली जातील, अशी माहिती सामंत यांनी दिली.

काही मिल कंपाउंडने अद्याप वन थर्ड जमीन दिली नसेल, तर ती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मुंबईत मिल कामगारांच्या घरांसाठी जागा उपलब्ध न झाल्यास ठाणे, वसई-विरार परिसरातही कामगारांसाठी घरे देण्यात येतील. शेवटच्या गिरणी कामगारांना घरे देण्यास शासन कटीबद्ध आहे, असे सामंत म्हणाले.

## १६ बी.एड. महाविद्यालयांची मान्यता रद्द

**मुंबई :** राज्यातील १६ बी.एड. महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च व तांत्रिक शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत दिली. या महाविद्यालयांनी अनिवार्य मूल्यांकन अहवाल वेळेत सादर न केल्यामुळे ही कठोर कारवाई करण्यात आली आहे. या संस्थांपैकी ७ महाविद्यालयांनी आपले कामकाज पूर्णतः बंद केले आहे. यामुळे सुमारे ५०० विद्यार्थी अडचणीत आले होते. मात्र, या विद्यार्थ्यांना इतर मान्यताप्राप्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश देऊन समायोजित केले जाईल त्यांनी स्पष्ट केले.

## महादेव मुंडेला न्याय कधी मिळणार?



**मुंबई :** महादेव मुंडे हा सामान्य माणूस परळीमध्ये जमिनीचा व्यवसाय करायचा. त्याने एक जमीन घेतली त्याला भाव मिळाला साडे दहाशे रुपये, १२ गुंठे जमीन होती. त्याला फोन आला जमीन सोड. तो म्हणाला अकराशे रुपये द्या मी सोडतो. त्यावर ८०० रुपयात दे असे धमकावले. नंतर धमकी आली व ८ दिवसांनी तहसीलदार कार्यालयाजवळ महादेव मुंडेचा मृतदेह आढळून आला.

या सगळ्यावर आकाचा हात होता, वाल्मीक कराडचा. या सगळ्याची माहिती बाळा बांगरने एसपींना सांगितले तर त्याच्यावरच सात केसेस पडले. आज महादेव मुंडेची पत्नी न्यायासाठी रडत आहे, सरकार या प्रकरणी काय करणार? असा सवाल राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

ज्ञानेश्वरी मुंडेंचे प्रकरण अतिशय गंभीर आहे. महादेव मुंडेंचा खून कुणी केला हे पोलिस खात्याला माहिती आहे. ज्यांच्यासमोर हे सर्व झाले त्या बाळा बांगर यांनी एक निवेदन पोलिसांना दिले आहे. वाल्मीक कराड आणि त्यांचा मुलगा काय बोलत होते, त्यानंतर महादेव मुंडेंची हत्या झाली हे सर्व बाळा बांगर यांनी तत्कालीन पोलिस अधीक्षकांना जाऊन सांगितले होते, असे ते म्हणाले.

## निधी मिळाला नसल्यामुळे अडचणी



**मुंबई :** कृषी विभागाला निधी मिळाला नसल्यामुळे कामे करण्यास अडचणी येत असल्याची कबुली राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधान परिषदेत दिली. पुढे बालताना ते म्हणाले, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संशोधन केंद्र स्थापनेबाबत आश्वासन देण्यात आले होते. मात्र, संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाने अनुकूलता न दर्शविल्याने त्यावर कार्यवाही करता आलेली नाही. राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालयाची तसेच संशोधन केंद्रांचे शासनावर लक्षणीय प्रमाणात दायित्व असल्याने हे दायित्व कमी होईपर्यंत नवीन महाविद्यालय आणि संशोधन केंद्र स्थापन न करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

## दुय्यम निरीक्षकांची पुढील भरती

# १००% जवानांमधूनच

### उत्पादन शुल्क विभागात मोठा बदल ■ अजित पवारांचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ : राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक (गट-क) पदासाठी येत्या काळात होणारी पदोन्नतीची भरती फक्त जवानांमधूनच केली जाणार असल्याचा मोठा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत जाहीर केला. शारीरिक क्षमता ही या पदासाठी अनिवार्य अट असल्याने लिपिक संवर्गातून भरती पुढे होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.



**सध्याची भरती पद्धत**
२५% थेट पदोन्नती
२५% मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा
(लिपिक : जवान = २०:८०)
५०% नामनिर्देशन

विधानसभेत लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना अजित पवार म्हणाले की, सध्याची भरती प्रक्रिया थांबवावी लागल्यास विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन निर्णय घेतला जाईल.

मात्र, ती थांबवणे शक्य नसेल, तर चालू भरती पूर्ण करून यापुढील सर्व पदोन्नती १००% जवान संवर्गातूनच केली जाईल.

यामुळे लिपिक संवगार्ला फक्त ५% संधी मिळत होती. मात्र, उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक हे गुन्हेगारी तपास, वाहन तपासणी, अवैध दारू वाहतूक नियंत्रण यांसारखी शारीरिक क्षमतेची कामे करत असल्याने, ह्यपदोन्नती फक्त जवानांमधूनच व्हावी, अशी सरकारची स्पष्ट भूमिका असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

**लिपिक संवर्गासाठी धक्का?**

या निर्णयामुळे लिपिक संवर्गातून दुय्यम निरीक्षक होण्याचे मार्ग बंद झाले असून, यापुढे जवानांनाच संधी मिळणार आहे. मात्र, चालू भरती प्रक्रियेवर कोणताही निर्णय घेतला नसून, ती प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## ठाकरे गटाचे हत्यार सभागृहाबाहेर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ : ठाकरे गटाचे आक्रमक नेते, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपुष्टात आला असून विधान परिषदेत त्यांचा निरोप समारंभ झाला.

२०१९ मध्ये छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून आलेले दानवे, २०२२ मध्ये शिंदे बंडानंतर विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदी विराजमान झाले. त्या काळात त्यांनी ठाकरे गटाचे जहाल वकिलीत्व केले. सरकारवर सडकून टीका, फडणवीस-शिंदेंना सवाल, आणि सभागृहात ठामपणे ठाकरे गटाचा आवाज बनले.

सध्याच्या राजकीय गणितांनुसार, त्यांच्या जागेसाठी पुन्हा निवडणूक होण्यासाठी छत्रपती संभाजीनगर, जालना महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका होणे आवश्यक आहे. त्याशिवाय विधान परिषदेच्या जागेवर निवडणूक होणार नाही. याचा अर्थ दानवेंना किमान काही महिने तरी बाहेरच राहावे लागणार आहे.

विधानसभेतील सदस्यांमधून निवडून येण्याचा पर्यायही तितकाच कठीण. कारण, ठाकरे गटाकडे सध्या केवळ २० आमदारांचे संख्याबळ आहे, आणि विधान परिषदेच्या जागेसाठी ४० ते ४५ आमदारांची आवश्यकता आहे. त्यामुळे विधानसभेतील मार्गही प्रश्नचिन्हाखाली आला आहे.

ठाकरे गटाचा हा आक्रमक आवाज काही काळासाठी तरी सभागृहातून गायब होणार, त्यामुळे सरकारला कदाचित सूट मिळू शकते. मात्र, अंबादास दानवे हे केवळ सभागृहापुरते मर्यादित नाहीत, तर ते रस्त्यावरही ठाकरे गटाचे मोठे हत्यार ठरू शकतात.

## विधानसभा अध्यक्षांवर भास्कर जाधवांची टीका



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ : सभात्याग केल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर जोरदार टीका केली.

विधानसभा अध्यक्ष स्वतः सरकारला वाचवण्यासाठी किती प्रयत्न करत आहात ते दाखवून धन्यता मिळवण्याचा प्रयत्न करत आहात. कामकाजाची परंपरा यांनी धुळीस मिळवली आहे. आम्हाला एरवी शिका म्हणणारे अध्यक्ष दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण अशा स्थितीत आहेत. उपमुख्यमंत्री उत्तर देत आहेत. मात्र अनेकांच्या विषयाला हात न घालता उपमुख्यमंत्र्यांनी राजकीय भाषण केल्याचा हल्लाबोल त्यांनी केला.

## वाळू उत्खनन : ५६ कोटींचा दंड

### अधिकारी निलंबित केल्याची महसूलमंत्र्यांची माहिती

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ : छत्रपती संभाजीनगर येथील वाळू उत्खननात झालेल्या मोठ्या गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने कठोर भूमिका घेतली असून, संबंधित कंपनीवर ५६ कोटींहून अधिक रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.



तसेच, या प्रकरणात दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत लक्षवेधीला उत्तर देताना दिली. विधान परिषद सदस्य विक्रम काळे यांनी ही लक्षवेधी मांडली होती.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने छत्रपती संभाजीनगरमधील रितीघाट नळजोडणीसाठी जी.सी.के.सी. प्रोजेक्ट अँड वर्क प्रायव्हेट लिमिटेड, जयपूर या कंपनीला काम दिले होते. या कंपनीने महालक्ष्मी लॉजिस्टिक नावाच्या ट्रान्सपोर्टरला वाळू वाहतुकीसाठी नियुक्त केले. उत्खननाची परवानगी असतानाही, कंपनीने १८,४८९ ब्रास वाळूचे अतिरिक्त उत्खनन केले. विशेष म्हणजे, १ मीटर ऐवजी १५-१८ फूट खोलीकरण केल्याचे निदर्शनास आले. त्याअन्वये दंड ठोठावण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## आदित्य ठाकरेंची टोलेबाजी अन् सत्ताधाऱ्यांकडून निलंबनाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ : विधानसभेत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे व भास्कर जाधव यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली.

सत्ताधारी शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी त्यांच्यावर समोरच्या बाकांकडे पाहून हातवारे व इशारे करण्याचा आरोप केला. अध्यक्षांच्या बाबतीत त्यांनी केलेले विधान हे अध्यक्षांचा अवमान आहे, असे ते म्हणाले.



शंभूराज देसाई सभागृहात म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नियम २९३ च्या चर्चेला उत्तर देत होते. हा रिप्लाय झाल्यानंतर काही सन्माननीय सदस्य विशेषतः उबाठाचे सदस्य भास्कर जाधव यांनी राईट टू रिप्लायचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर तुम्ही राईटली पॉइंटेडली जे काही नियम आहेत आपले, त्याचा आधार घेऊन जे स्वतः चर्चेलासुरुवात करतात त्याला राईट ऑफ रिल्पाय आहे हे नमूद केले. त्यानंतर जे झाले ते सीसीटीव्ही पाहा.

अध्यक्षांनी सभागृहातील सीसीटीव्हीचे फुटेज काढावे. अध्यक्षांकडे पाहून जे हातवारे करून ते बोलले, ज्या त्वेषात ते बोलले ते पाहा. रेकॉर्डिंग असेल तर रेकॉर्डिंग काढा. आम्ही इथून ऐकले. तुम्ही रेटून कामकाज नेऊ शकत नाही. तुम्ही मनमानीने कारभार करू शकत नाही हे आम्ही ऐकले. अध्यक्षांच्या बाबतीत अशा पद्धतीचे अवमानकारक वक्तव्य करणे हा अध्यक्षांचा अवमान आहे.

हा प्रकार झाल्यानंतर ज्यांनी हा प्रस्ताव सुरू झाला ते सदस्य सभागृहात आले. ते म्हणाले की, धाडस लागते बोलायला. त्यावर आम्ही म्हणालो की, तुम्ही ऐकले असते तर तुम्हाला राईट टू रिप्लाय होता, पण माझी दुसरी विनंती आहे. उबाठाचे दुसरे आदित्य ठाकरे यांचेही सीसीटीव्ही फुटेज आहे. त्यांनी जे हातवारे केले. समोरच्या बाकड्यांकडे पाहून त्यांनी जे इशारे केले. ते सुद्धा विधानसभेच्या नियमात बसणारे नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण स्वतः दोन्ही सभासदांचे सभागृहातील व्हिडिओ फुटेज तपासा आणि ते जे बोलले ते पाहा.

भास्कर जाधव यांनी आपल्याकडे जे हातवारे केले, त्यावर त्यांनी आपली माफी मागितली पाहिजे. त्यांनी माफी मागितली नाही तर त्यांना निलंबित करावे. तसेच आदित्य ठाकरे यांनीही समोरच्या बाकाकडे पाहून जे हातवारे व इशारे केले, जी दमदाटी करण्याचा प्रयत्न केले, जे अर्वाच्य शब्द वापरले. हे सगळे रेकॉर्डवर आपण तपासून पाहा व त्यांच्यावरही कारवाई करा ही सभागृहाची आपल्याला विनंती आहे.

त्यानंतर राहुल नार्वेकर यांनी आपण पुढे जाऊ असे सांगत कामकाज पुढे सरकवण्याचा प्रयत्न केला. पण यावेळी सत्ताधारी व विरोधकांत जोरदार शाब्दिक चकमक झाली. विधानसभेच्या अध्यक्षांचा अवमान हा सभागृहाचा अवमान असतो, असेही नार्वेकर म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या चर्चेत हस्तक्षेप करताना म्हणाले, सत्ताधारी व विरोधक एका रथाची दोन चाके असतात. आम्ही विरोधकांना केव्हाही कमी लेखले नाही. भास्कर जाधव यांनी ज्या पद्धतीने हातवारे करून बोलत होते, ही पद्धत बरोबर होती का? हे मला सांगा. शेवटी अध्यक्षांचे महत्व आहे. या सभागृहाची एक प्रतिष्ठा आहे, असे शिंदे म्हणाले.

### गद्दार, नमक हराम, एहसान फरामोश...



आमदार आदित्य ठाकरे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर चांगलेच तोंडसूख दिले. त्यांनी त्यांना गद्दार, नमक हराम, एहसान फरामोश, निर्लज्ज व्यक्ती अशा विविध उपमा देत आपल्या मनातील संताप व्यक्त केला. आतापर्यंतच्या एकाही मुख्यमंत्र्याने नगरविकास खाते दुसऱ्या मंत्र्याला दिले नाही. पण यांना देण्यात आले. पण त्यांनी काय केले तर गद्दारी. यांना थोडीही लाज वाटत नाही. ज्या व्यक्तीने एवढे सगळे दिले, त्याच्यावरच आरोप करता. काही संस्कार आहेत की नाही? असे ते आपला रोष व्यक्त करताना म्हणाले.

परवा सभागृहात चड्डी बनियन गँगच्या लोकांनी जे काही ओम भट स्वाहा केले ते सर्वांनी पाहिले. म्हणूनच मी हातवारे केले. टाचण्या टोचण्याविषयी. हो केले मी हातवारे. माझ्यावर कारवाई करा. कारण, उपमुख्यमंत्र्यांएवढे नमक हराम, एहसान फरामोश व्यक्ती मी पाहिले नाहीत.

# विधानभवनात आमदारांकडूनच सुरक्षा नियमांचा भंग

### पोलिसांनी विधानसभा अध्यक्षांना पाठवला अहवाल : राहुल नार्वेकरांनी दिल्या कडक सूचना

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७: महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान काही आमदारांकडून सुरक्षा नियमांची पायमल्ली होत असल्याची माहिती समोर आली आहे.

विधानसभा सुरक्षेत तैनात पोलिसांनी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सादर केलेल्या अहवालात या गंभीर प्रकारांचा उल्लेख असून, नियमांचे सातत्याने उल्लंघन होत असल्याचे सांगितले आहे. यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांनी देखील कडक भूमिका घेत, पोलिसांना काही सूचना केल्या आहेत.

विधानसभा सुरक्षेतील पोलिसांनी विधानसभा अध्यक्षांकडे सादर केलेल्या अहवालात म्हटले की, अनेक आमदार सभागृहात जाण्यापूर्वी विधानभवनाच्या लॉबीत आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन येतात. याठिकाणी कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या जातात, तसेच फोटो सेशन्सही घेतले जातात.

ही कृती कोणत्याही एका पक्षापुरती मर्यादित नसून सर्वच पक्षांतील आमदारांकडून अशा घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

लॉबीत प्रवेशासंबंधी स्पष्ट नियम असून, केवळ अधिकृत शासकीय स्वीय सहाय्यकांनाच आमदारांसोबत प्रवेश दिला जाऊ शकतो. मात्र प्रत्यक्षात कार्यकर्ते आणि इतर लोक उपस्थित राहतात. सुरक्षा रक्षक या नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न करताच, त्यांना कारणे देऊन दुर्लक्ष केले जाते, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.



**पासशिवाय वाहनांना प्रवेश**

अनेक आमदार आपल्या गाडीतून विधानभवनात पास नसताना एन्ट्री देत असल्याचे देखील समोर आले आहे. आमदारांची सुरक्षा लक्षात घेता याबाबत वेळोवेळी सूचना करून देखील आमदार ऐकत नसल्यानेच याबाबतचा अहवाल विधानसभा अध्यक्षांकडे देण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

**विधानसभा अध्यक्षांच्या सूचना**

दरम्यान, याबाबत ओळखपत्र पाहिल्याशिवाय कुणालाही विधानभवनात सोडू नये, अशा सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मंत्रालय सुरक्षा पोलिसांना दिल्या आहेत.

तर विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही ठिकाणी आणि सदस्य लॉबीतही फक्त स्वीय सहाय्यकांना ओळखपत्र तपासूनच सोडण्यात यावे, पोलिसांनी अधिकाराचा पूर्ण वापर करावा, अशा अनेक सूचना विधानसभा अध्यक्षांनी दिल्याची माहिती समोर येत आहे.

## जिल्ह्याला राष्ट्रीय पारितोषिक मिळाल्याबद्दल उद्योजकांकडून जिल्हाधिकाऱ्यांचा गौरव

**अकोला :** एक जिल्हा एक उत्पादनमध्ये अकोला जिल्ह्याला राष्ट्रीय पारितोषिक मिळाल्याबद्दल संघा क्लस्टर व औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींतर्फे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचा गौरव करण्यात आला.संघा क्लस्टरचे प्रवर्तक कश्यप जगताप, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, अकोला औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, सहउपाध्यक्ष कमलेश अग्रवाल, सचिव विनीत बियाणी, प्रसन्न रत्नपारखी,



अधिक्षक भगवंतराव अनवणे आदी उपस्थित होते. जिल्हाधिका-यांच्या नियोजन व मार्गदर्शनाने पुरस्कार प्राप्त झाल्याची प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

### शाळांचे परिसर एका महिन्यात तंबाखूमुक्त करण्याचे आदेश

# केवळ कागदावर नको; प्रत्यक्षात कार्यवाही करा : जिल्हाधिकारी

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
जिल्ह्यातील सर्व शाळांचे परिसर एका महिन्यात तंबाखूमुक्त करावेत. केवळ कागदावर कार्यवाही न करता प्रत्यक्षात अंमलबजावणी करावी, असे सुस्पष्ट आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.



जिल्हा अमली पदार्थ प्रतिबंध समन्वय समितीच्या बैठक जिल्हाधिका-यांच्या दालनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. अपर पोलीस अधिक्षक सी. के. रेड्डी, उपविभागीय अधिकारी शरद जावळे यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, भावी पिढीला व्यसनांपासून मुक्त ठेवण्यासाठी योग्य माहितीचा प्रसार, तसेच संबंधित नियम, अधिनियमांची कठोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. केवळ शाळाच नव्हे, तर नियम ानुसार परिसरही तंबाखूमुक्त झाला पाहिजे. कागदावर नको; प्रत्यक्षातील कार्यवाही झाली पाहिजे. शाळांलगतच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होता कामा नये. त्यासाठी नुसते फलक लावून उपयोग नाही. अशी दुकाने असतील तर पोलीसांची मदत घेऊन ती तत्काळ हटवावीत. एका महिन्यात जिल्ह्यातील सर्व शाळांचे परिसर तंबाखूमुक्त झाले पाहिजेत. अमली पदार्थांची वाहतूक होऊ नये म्हणून आवश्यक तिथे वाहनांच्या तपासण्या, सार्वजनिक ठिकाणांची नियमित देखरेख, उत्पादन होऊ नये म्हणून कारखान्यांच्या तपासण्या, संशयास्पद स्थळांचा शोध व कारवाई आदींचे कटाक्षाने पालन व्हावे. अंमली पदार्थांची वाहतूक, विक्री, वापर याला प्रतिबंध करतानाच, या पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत भरीव जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी दिले.

## अकोला अडंरपास मधील पावसाळी पाण्याची विल्हेवाट लावण्याचे किती वेळा तक्रारी वृत्तपत्रात प्रकाशित :विजय अग्रवाल

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
सिंधी कॅम्प चौक पासून ते क्रिकेट क्लब पर्यंत असलेल्या उड्डाणपूल तसेच टॉवर चौक ते बस स्टॅन्ड पर्यंत असलेले अंडरपास संदर्भात भाजपा नेते विजय अग्रवाल यांनी केंद्रीय मंत्री नामदार नितीन गडकरी नॅशनल हायवे अधिकारी सोळंके यांना साकडे, घालून यामधील पथदिवे रस्त्यावरील अडचणी तसेच अंडरपास मध्ये जमा होणारा पाणी पावसाळ्यात यासंदर्भात लक्ष देऊन अकोले करांना न्याय देण्याची मागणी केली आहे.माजी केंद्रीय मंत्री संजय भाऊ धोत्रे व लोकप्रिय



आमदार स्वर्गीय गोवर्धन शर्मा यांच्या सतत पाठपुराव्यानंतर अकोल्यात उड्डाणपूल झाले परंतु अंडरपास मुळे सरकारची व पक्षाची बदनामी होत असून या संदर्भात वारंवार नॅशनल हायवे अधिकारी अमरावती यांच्याकडे तक्रारी केल्यावर सुद्धा लक्ष देण्यात येत नाही. वृत्तपत्र तसेच वृत्तवाहिनी यामध्ये वारंवार या संदर्भात वृत्त प्रकाशित होत असताना अधिकारी वर्ग झोपेचे नाटक करून केवळ वेळेवर पाणी काढण्याचा प्रकार करत आहे.

### आज पासून अकोला शहरातील

# पाणी पुरवठा ३ दिवसा आड

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
अकोला महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेकरीता मुख्य जलस्त्रोत काटेपूर्णा प्रकल्प (महान) असुन आज दि. १७ जुलै २०२५ रोजी प्रकल्पामध्ये २४.४२ दलघमी एवढा साठा उपलब्ध असून सद्यस्थितीत दिवसेंदिवस धरणातील पाणीसाठ्यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे आठवडयातुन एक दिवस होणारा पाणी पुरवठा दि. १८ जुलै, २०२५ पासुन ३ दिवसआड ४ थे दिवशी करण्यात येत असल्यामुळे ६५ चङऊ प्लांट वरील महाजनी जलकुंभ, मोठी उमरी, गुडधी जलकुंभ, नेहरू पार्क जलकुंभ, तोष्णीवाल जलकुंभ, आदर्श कॉलनी, जलकुंभ, केशव नगर जलकुंभ, रेल्वे स्टेशन जलकुंभ, गंगा नगर जलकुंभ, अकोट फैल जलकुंभ, जोगळेकर प्लॉट जलकुंभ, लोकमान्य नगर जलकुंभ तसेच २५ चङऊ वरुन होणारा पाणी पुरवठा जसे शिवनगर, आश्रय नगर व बस स्टॅन्ड मागील जलकुंभावरुन, शिवणी जलकुंभ, शिवर जलकुंभ, शिवापुर जलकुंभ वरून होणारा पाणीपुरवठा ३ दिवसआड ४ थे दिवशी करण्यात येईल.

# उड्डाणपुल भुयारी मार्गात साचलेल्या पाण्यात तरंगताना दिसला मृतदेह

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
मध्यवर्ती ठिकाण असलेल्या मदनलाल धींग्रा चौक बस स्थानक समोरील अटल बिहारी वाजपेयी उड्डाणपूल भुयारी मार्गात पावसाच्या साचलेल्या पाण्यात आज गुरुवार १७ जुलै रोजी सकाळी एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह काही नागरिकांना तरंगताना दिसल्याने शहरात खळबळ उडाली.घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून शवविच्छेदनासाठी मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. हा मृतदेह ४० ते ५० वयो गटातील असावा, असा कयास आहे.दरम्यान, सिटी कोतवाली पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे. मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी परिसरातील लोकांशी चौकशी करण्यात येत आहे. तसेच अलीकडील





काही दिवसांपासून बेपत्ता झालेल्या व्यक्तींबाबतच्या तक्रारींचाही अभ्यास केला जात आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल आणि त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी करताहेत डोळेझाक मदनलाल धींग्रा चौक हे अकोला शहरातील दाट वदर्ळीचे ठिकाण असूनही या परिसरात रात्रीच्या वेळी अपुरी प्रकाशव्यवस्था, अस्वच्छता आणि सीसीटीव्ही व्यवस्था नसणे ही मोठी दुर्लक्षित बाब आहे. तसेच पुलाखाली अनेक बेघर नागरिकांनी घर केलेली आहेत. या लोकांची दररोजची भांडण मारपीट रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांना दिसते. यामुळे अनेकदा वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

मात्र प्रशासनाला ही बाब अजिबात दिसत नसल्याने भविष्यात मोठी घटना घडल्यास आश्चर्य वाटायला नको. थोडा जरी पाऊस आला तरी उड्डाणपुल भुयारी मार्गाला तरण तलावाचे स्वरूप येते. ही नित्याची बाब झाली आहे. मात्र प्रशासनाकडे येथील साचलेले पाणी त्वरित काढून मार्ग वाहतुकीस मोकळा द्यावा, यासाठी कुठलीही यंत्रणा नाही, ही दुर्दैवी बाब आहे. एकंदरीतच शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यासर्व गोष्टींकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करुन भविष्यात मोठी काहीतरी दुर्घटना व्हावी याची जणू वाट बघताहेत, अश्या संतप्त प्रतिक्रिया आजच्या घटनेनंतर अकोल्यातील नागरिकांनी व्यक्त केल्या.

## थोडक्यात

### २ मुष्टियोद्धा खेळाडूंची प्रशिक्षणासाठी निवड

**अकोला :** येथील दोन मुष्टियोद्धा महिला खेळाडूंची छत्रपती संभाजीनगर येथे होणा-या युवक आंतरराष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. अकोल्याची राष्ट्रीय सुवर्णपदक प्राप्त खेळाडू समीक्षा सोळंके हिची ४८



किलो वजन गटात आणि शालेय राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू रेवती उंबरकर हिची ६० किलो वजन गटात निवड झाली आहे.भारतीय मुष्टियुद्ध परिषद व भारतीय खेळ प्राधिकरणातर्फे हे प्रशिक्षण छ. संभाजीनगर येथे होत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी हे उपयुक्त आहे.

### सैनिकी मुलांच्या वसतिगृहात कंत्राटी स्वयंपाकी पदाची भरती

**अकोला :** सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहामध्ये कंत्राटी स्वयंपाकी पदासाठी माजी सैनिक, दिवंगत सैनिकांच्या पत्नी आणि अवलंबितांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडे दि. २२ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावे व या संधीचा लाभ घ्यावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद शरद पाथरकर यांनी कळिवले आहे.

### अकोट तालुक्यातील १७ संस्था अवसायनात

**अकोला :** अकोट येथील सहकारी संस्था सहायक निबंधकांच्या कार्यक्षेत्रातील १७ सहकारी संस्था अंतिमत: अवसायनात ठरविण्यात आल्या आहेत. अवसायकांची अंतिम सभा दि. २८ जुलै रोजी दु. १२ वा. सहायक निबंधकांच्या कार्यालयात होईल. हे कार्यालय अकोटमध्ये पोपटखेड रस्त्यावर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आहे. सभेला संस्थेच्या संचालक मंडळाने संपूर्ण दस्तऐवजासह उपस्थित राहण्याचे आवाहन सहायक निबंधक रोहिणी विटणकर यांनी केले आहे.अवसायकांमध्ये अकोट येथील स्वामी समर्थ सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, राजर्षी शाहू सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, नरनाळा सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, राष्ट्रपिता महात्मा गांधी सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, कृषी समृद्धी सहकारी संस्था, श्री नागास्वामी औषधी व सुगंधी वनस्पती, मसाला पीके उत्पादक सहकारी संस्था., नागवेली अभिनव शेती सहकारी संस्था, गजानन गृहनिर्माण सहकारी संस्था, सिद्धीविनायक गृहतारण सह. संस्था, रामदेव गृहनिर्माण सह. संस्था, लक्ष्मीनारायण गृहतारण सह. संस्था, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सह. संस्था यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, मुंडगाव येथील पीक संरक्षण सहकारी संस्था, माता लक्ष्मी अभिवन शेती विविध तंत्रज्ञान संगोपन व समृद्धी सहकारी संस्था, श्री दत्त ग्रामीण उद्योग सहकारी संस्था यांचा समावेश आहे. रौंदळा येथील स्वामी विवेकानंद व्यवसाय तंत्रज्ञान सेवा सह. संस्था, केळीवेळी येथील वनसंवर्धन सहकारी संस्था या संस्था समाविष्ट आहेत.

### अकोला पोलीसांचा कोम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी दरम्यान गुन्हेगारांवर प्रहार

# जिल्हयात ७ हत्यार जप्त व ५ तडीपार इसमांवर कारवाई

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
मा. पोलीस अधीक्षक, श्री अर्चित चांडक यांचे आदेशान्वये संपुर्ण जिल्हयात दि. १६.०७.२०२५ चे रात्री २२.०० वा ते दि.१७.०७.२०२५ चे ०५.०० वा पावेतो संपुर्ण अकोला जिल्हयात नाकाबंदी व कोम्बींग चे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने, अपर पोलीस अधिक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी असे एकुण ३९ अधिकारी व २१३ अंमलदार यांना नियुक्त करण्यात आले होते.मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी स्वतः सहभाग घेवुन नाकाबंदी दरम्यान पॉईट वर भेटी देवुन निरीक्षण केले व आवश्यक त्या सुचना दिल्या. त्या अनुषंगाने जिल्हयातील एकुण ३० नाकाबंदी पॉईट वर ७४० वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये १४७



कारवाई करून ५५१००/- रू चा दंड आकरण्यात आला आहे. तसेच कोम्बींग आपरेशन दरम्यान १२९ समन्स, ५२ जमानती वॉरंट, १६ पकड वॉरंट तामील करण्यात आले. ७९ अभिलेखावरील निगराणी बदमाश व माहितीगार गुन्हेगार यांना चेक करण्यात आले व कलम १२२ मपोका प्रमाणे १८ कारवाई, कलम १४२ मपोका प्रमाणे ०५ केसेस, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे ०७ केसेस करण्यात आल्या आहेत. कलम ३३ आर डब्लयु प्रमाणे ०७ केसेस तर कलम ११०,११७ महाराष्ट्र पोलीस कायदया प्रमाणे ७० केसेस करून जिल्हयातील ८० हॉटेल लॉजेस व ७२ एटीएम चेक करण्यात आले. तसेच महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम प्रमाणे एकुण ०४ केसेस व महाराष्ट्र जुगार अधिनियम अंतर्गत ०१ केस करण्यात आली आहे.

## शासकीय वसतिगृहात ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे राज्यात मागासवर्गीय मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृहे चालवली जातात. त्यात ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहात इयत्ता ११ वी व इतर जागा रिक्त राहिल्यास बिगर व्यावसायिक प्रशिक्षण जसे बीए, बीकॉम, बीएस्सीसाठी जागा भरण्यात येणार आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्याची hmas.mahait.org या लिंकवर सुरु झाली आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यास अडचण असल्यास ऑफलाईन अर्ज वसतिगृहात स्वीकारून ७ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. त्यानुसार गुणवत्ता व आरक्षणनिहाय म ागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.अकोल्याचा रहिवासी नसलेल्या परंतु अकोला मनपा हद्दीतील महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या किंवा घेऊ इच्छिणाऱ्या जास्तीत जास्त होतकरू मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, मुर्तिजापूर रोड, जुने प्रादेशिक परिवहन कार्यालयाजवळ, किर्तीनगर येथे अर्ज सादर करावा, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल एस. एस. लव्हाळे यांनी केले आहे.

# अकोला मनपाच्या मलशुद्धीकरण केंद्रासाठी शासकीय जागा

- ५ हेक्टर जमीन देण्याचा देवेंद्र फडणवीस व बावनकुळे यांचा पुढाकार
- अकोल्याच्या सार्वजनिक आरोग्यासाठी पाऊल सरकारचे अभिनंदन भाजप तर्फे

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
अकोला महानगरपालिकेला मलनिस्सारण केंद्रासाठी शिलोडा येथील ५ हेक्टर शासकीय विनामूल्य देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे अकोला शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाची समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे.अमरावती विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी, अकोला यांच्या पत्रांच्यासंदर्भाने, महानगरपालिकेच्या मलशुद्धीकरण केंद्राकरिता मौजे शिलोडा येथील गट क्र. ३८ मधील एकूण ११.४८ हेक्टर क्षेत्रापैकी ८.५५ + ०.५३ पो.ख. पैकी ५.०० हेक्टर आर शासकीय जमीन विनामूल्य किंवा भोगवटामूल्य घेऊन देण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. या सरकारच्या निर्णयाचे भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री नामदार एडवोकेट आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल विजय अग्रवाल, जयंत मसने, अर्चनाताई मसने, सुमन ताई गावंडे, किशोर पाटील वैशालीताई शेळके यांनी अभिनंदन केले आहे शासनाने दि ७ मार्च २००६ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेतल्या आहेत. त्यानुसार, रस्ते, बगीचा, खेळाचे मैदान, उद्यान, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, पथदीप, मलनिस्सारण, सांडपाणी, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी, दफनभूमी यांसारख्या प्रयोजनांसाठी विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या शासकीय जमिनी स्थानिक स्वराज्य संस्थांना विनामूल्य देण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसारच, अकोला शहरातील मौजे शिलोडा येथील गट क्र. ३८ मधील ५.०० हेक्टर आर जागेचा आगाऊ ताबा अकोला महानगरपालिकेस मलशुद्धीकरण केंद्राकरिता विनामूल्य देण्यास अकोला जिल्हाधिकारी अजित कुंभार जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. व शासनाने आता विनामूल्य देण्याचा निर्णय घेऊन अकोले करांना भेट दिली आहे व दे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द व अकोल्याचे पालक व म्हणून त्यांचं प्रेम पुन्हा सिद्ध झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अकोला भाजपाने अभिनंदन केले आहे महायुती सरकार सातत्याने विकासासाठी सर्वसामान्यांच्या पाठीशी उभ्या आहे हे पुन्हा सिद्ध झाला आहे.

**अकोला महानगरपालिकेची जुनी मागणी होती. त्यासाठी विविध विभागांमार्फत पाठपुरावा करण्यात येत होता. अकोला शहरातील जनसामान्यांच्या सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भातील हा विषय असल्याने तो प्राधान्याने मार्गी लावण्यात यश आले याचे समाधान आहे. यामुळे अकोल्याचे सार्वजनिक आरोग्य नीट राहू शकेल.चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्रीयांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त करून अकोले करांना अनेक विकास कामासाठी आपण सदैव पटी पाठीशी उभे राहू असे अभिवचन दिले असे आमदार सावरकर यांनी सांगितले.**

# कावड यात्रेसाठी प्रशासनाकडून प्रमाणित कार्यपद्धती निश्चित

**▪अकोला,दि १७ (प्रतिनिधी) :**
श्रावण सोमवारी मोठ्या प्रमाणावर आयोजित कावड यात्रा व पालखी मिरवणूक लक्षात घेऊन हा उत्सव शांततेत पार पडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात आली आहे, तसेच विविध अधिका-यांना जबाबदा-या नेमून देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी याबाबतचा आदेश निर्गमित केला आहे. कावड, पालखी उत्सवानिमित्त अकोला शहरामध्ये व पालखी मार्गाकरिता अकोल्याचे उपविभागीय दंडाधिकारी डॉ. शरद जावळे यांना. तसेच अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांना तिस-या सोमवारी (११ ऑगस्ट) धारगड येथे होणा-या यात्रेसाठी इन्सिडंट कमांडर म्हणून नेमण्यात आले आहे. गांधीग्राम येथे पूर्णा नदीच्या पुलावर लायटिंगची व्यवस्था, आपातापा चौकात वॉच टॉवर, मंदिर परिसरात बांबू बॅरेकेटिंग, अकोटपेठेतील उघड्यावर होणारी मांसविक्री बंद ठेवणे, पालखी मार्गावर अधिकारी, कर्मचा-यांची पथके नेमणे आदींसाठी महापालिका उपायुक्त गीता ठाकरे यांच्याकडे डेप्युटी इन्सिडंट कमांडर म्हणून



जबाबदारी देण्यात आली आहे.सर्व भाविकांना स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा, रस्त्यांची दुरूस्ती, आवश्यक ठिकाणी मोबाईल स्वच्छतागृहे, रस्तेसफाई, अतिक्रमण काढणे, अग्निशमन व्यवस्था, क्रेन, वैद्यकीय पथके, संवेदनशील भागात, चौकात सीसीटीव्ही आदी व्यवस्था उभारण्याचे आदेश आहेत. गांधीग्राम येथील पुर्णा नदीवरचा घाट व पुलावरील तुटलेले कठड्यांची दुरूस्ती, घाटावरील स्वच्छता, पार्किंग व्यवस्था, पूर्णा नदी पात्रापासून ते श्री राजराजेश्वर मंदिरापर्यंत रस्त्याबाबतच्या अडचणी दूर करणे, रस्ता दुरूस्ती, मिरवणूक मार्गावर बाजूला रिफ्लेक्टर, आपातापा चौक ते पाचमोरी रस्त्यातील दुभाजकाची दुरूस्ती आदी जबाबदा-या 'पीडब्ल्यूडी'चे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. कथलकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

महिला कावड सुरक्षेच्या दृष्टीने कार्यवाही, कायदा व सुव्यवस्था राखणे, रहदारी नियंत्रण, रस्त्यावर पेट्रोलिंग करणे, पालखीसोबत किमान २ स्पीकर घेऊन जाण्यास परवानगी देणे, आवश्यक त्या ठिकाणी बॅरेकेटिंग, आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही, नियंत्रण कक्ष २४ तास चालू ठेवणे, मिरवणूक मार्गावरील अतिसंवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस मनुष्यबळ व बंदोबस्त, परिवहन विभागाकडून वाहनांची तपासणी आदी जबाबदा-या उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी, प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, तहसीलदार सुरेश कव्हळे आदींना सोपविण्यात आल्या आहेत. मार्गावर वैद्यकीय पथक, रूग्णवाहिका, औषधसाठा आदी विविध जबाबदा-या जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे व जिल्हा आरोग्य अधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

## माळराजुरा येथे हातात सतुर घेऊन आरोपींची गावात दहशत; एकास काठीने मारहाण

**▪पातुर,दि १७ (प्रतिनिधी) :**
पातूर पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम माळराजुरा येथे १३ जुलै च्या रात्री नऊ वाजता चे दरम्यान आरोपिणे हातात सुरा घेऊन गावात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला तसेच फिर्यादी महिलेस अश्लील शिवीगाळ केली. व फिर्यादीच्या भाच्याला काठीने मारहाण करून फिर्यादीस व तिचे पती मारण्याची आरोपींनी धमकी दिली.आरोपी विरुद्ध तक्रारीवरून पातूर पोलिसात आर्मअ‍ॅक्ट नुसार १४ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृत्तलिहेपर्यंत आरोपीला अटक करण्यात आली नव्हती. त्यामुळे गावात भीतीची वातावरण पसरले आहे.पातूर पोलिसांच्या माहितीनुसार फिर्यादी सौ लक्ष्मीबाई निरंजन लोखंडे वय ४० राहणार माळराजुरा यांच्या तक्रारीवरून १३ जुलै चे रात्री नऊ वाजता दरम्यान मी घरी हजर असताना गावातील रोशन सुदामा खंडारे वय १९ वर्ष व सुदामा बंडू खंडारे व ४४ वर्ष राहणार माळराजुरा हे आमच्या शेजारी असलेल्या दुकानाचे शटर दोन्ही बापलेक मद्य धुंद अवस्थेत वाजवीत असल्यामुळे मी त्यांना हटकले असता, तुम्ही सेटर का वाजविता असे म्हटल्यावर दोन्ही इस्मानी मला शिवीगाळ केली. तुला काय करायचे आहे आम्ही काही करू असे सांगितले म्हणून मी त्यांना सांगितले की सदर दुकानदार आमचे नातेवाईक आहे ते घरी हजर नाही तरी रोशन खंडारे हातात लाकडी काठी घेऊन मला मारण्यासाठी आला असता त्या ठिकाणी माझा भाचा गजानन शिंदे हा हजर असल्याने तो मला वाचविण्यासाठी मध्ये आला.

# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अगेसर

भाऊ साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. लावण्या, पोवाडे व पथनाटये या माध्यमातून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात जनजागृती करण्यासाठी मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सिमाभागातील अनेक ठिकाणी शाहीरांनी आपल्या लालबावटा कलापथकातर्फे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची १९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है! इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन मध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठी भाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती. या चळवळीत त्यांची अग्रसर भूमिका होती.

---------------

अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते. सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करतांना दिसतात.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

प्र. के. अत्रे, कॉ. श्री. अ. डांगे, एसेम, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या संपर्कात आल्याने अण्णाभाऊंचे लेखन अधिक खुलत गेले. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या प्रेरणेने त्यांना साहित्यात अधिष्ठान लाभले.



अण्णाभाऊंनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले असले तरी, त्यांचा मूळपिंड शाहिराचा आणि कविचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील, पण माणुस म्हणुन जगण्याचा प्रश्न शिल्क राहतोच. मला भाकरी पेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे, या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले.

हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रातून आपले अस्तित्व दाखवू लागला. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंतांकडुन होणारे गरीबांचे शोषण नि-अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणुक या बाबींवर आपल्या लेखणीने सतत प्रहार केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि गेल्या ५० वर्षात झालेल्या साहित्य, संस्कृतीच्या जडण-घडणीत मराठी साहित्य आणि साहित्यीकांचे योगदान त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊंचे लक्षणीय ठरले.

भाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या फकिरा मध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. १९५८ मध्ये बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे.

यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, हृदलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.

अण्णाभाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांनी फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत.

या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत.

मुंबई, पुणे आणि मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला. त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणी कामगार या दोन गाण्यांतून मुंबईला दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण असे म्हटले आहे. त्यांच्या कार्याची मोजदाद करताच येत नाही, इतक्या भव्य प्रमाणात त्यांची कारकीर्द नजरेत भरते, तिला दुर्लक्षित करुन चालणार नाही.

भाऊ साठे हे दलितांचे आणि विशेषतः मांग जातीचे प्रतीक बनले आहेत. शासन मान्यता असलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना १९८५ मध्ये मांग समाजातील लोकांसाठी करण्यात आली. तसेच मानव हक्क अभियानाच्या (एक मांग-आंबेडकरी संस्था) मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष- शिवसेना युती सारख्या राजकीय पक्षांनी मांगांकडून निवडणुकांमध्ये समर्थन मिळविण्यासाठी त्यांच्या प्रतिमेचा वापर केला आहे आणि आजही करीत असतात.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले. साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, ज्याला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ गैरभारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्या व्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

१ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने ४ रु. च्या टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते. साठेंच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १ ऑगस्ट २०१९ रोजी हे टपाल तिकीट वितरित करण्यात आले. पुण्यातील सेनापती बापट चौकानजीक रस्त्याला अण्णाभाऊ साठे मार्ग म्हणुन घोषित करण्यात आले.

मुंबईच्या कुर्लामधील एका उड्डाणपुलासह अनेक इमारतींना त्यांचे नांव देण्यात आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी, त्यांना आदराने व विनम्रपणे श्रद्धांजली अर्पण करणे, हा मराठी भाषिकांसाठी एक महत्त्वाचा दिवस असतो. त्यांच्या कायार्ला व विचारांना स्मरून त्यांना आदराने अभिवादन करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



आज १८ जुलै साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज पुण्यतिथी. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला.

त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला.

१९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले.

१९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला.

त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या.

फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे. अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे.

त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते.

*जग बदल घालुनी घाव!*
*सांगून गेले मज भीमराव!*

हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे.

१९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पददलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना विनम्र अभिवादन! ■ ■ ■

---

# आनंद कभी मरते नहीं..

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज तेरावी पुण्यतिथी.



राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले.

त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले.

पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले. पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले.

या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिलीण हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता.

पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या.

चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते.

त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली.

सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले.

त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले.

१८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

बाबूमोशाय....... बाबू मोशाय.. जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है.... राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

# आता थांबायचं नाय!... शिक्षणाची खरी प्रेरणा!

मुंबई महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त म्हणून निवृत्त झालेले उदयकुमार शिरूरकर यांनी खरंच एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. २०१६ मध्ये घडलेली त्यांची ही अविश्वसनीय खरी गोष्ट 'आता थांबायचं नाय!' या प्रेरणादायी चित्रपटातून आता प्रेक्षकांसमोर आली आहे. हा केवळ एक चित्रपट नाही, तर स्वप्न पाहणाऱ्या आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने लढणाऱ्या माणसांची ही एक हृदयस्पर्शी गाथा आहे.

------------





**एका साहेबाने बदललं २३ शिपायांचं आयुष्य!**

उदयकुमार शिरूरकर यांनी इटउ मधील २३ अशा शिपायांना निवडलं, ज्यांचं शालेय शिक्षण अपूर्ण राहिलं होतं. त्यांनी या सर्वांना रात्रीच्या शाळेत पुन्हा प्रवेश घेण्यासाठी प्रेरित केलं. वय, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेची कमतरता झ अशा अनेक अडचणींवर मात करत, या २३ कर्मचाऱ्यांनी अफाट मेहनत घेतली आणि दहावीची परीक्षा दिली.

याचं फलित काय? सगळेच्या सगळे उत्तीर्ण झाले! अनेकांनी तर उत्कृष्ट गुणांनी यश मिळवून समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला. हीच खरी शिक्षणाची ताकद!

**अकोल्यातील रात्रीची शाळा फक्त निकालांपुरतीच का?**

अकोल्यातही रात्रीची शाळा आहे, ही समाधानाची बाब. पण दुर्दैवाने, ती फक्त निकालाच्या दिवशीच चर्चेत येते. वर्षभर ही शाळा, तिथे शिकणारे विद्यार्थी, त्यांचे कष्ट आणि संघर्ष, याकडे कुणाचंच लक्ष नसतं.

ही परिस्थिती बदलणं गरजेचं आहे. कारण शाळा ही केवळ एक इमारत नाही, तर ती असंख्य लोकांच्या जीवनात आशेचा नवा किरण आहे. आजही आपले अनेक मजूर बंधू-भगिनी, कष्टकरी महिला, हमाल, सफाई कर्मचारी असे विविध स्तरातील नागरिक शिक्षणाची प्रचंड ओढ बाळगून आहेत. पण त्यांच्याकडे कोण लक्ष देणार? त्यांना योग्य संधी कोण मिळवून देणार?

**केवळ चित्रपट नाही... एक सामाजिक क्रांती!**

'आता थांबायचं नाय!' हा चित्रपट केवळ उदयकुमार शिरूरकर यांची कथा सांगत नाही, तर तो प्रत्येक अशा व्यक्तीसाठी आहे ज्याला वाटतं की, आता खूप उशीर झाला. हेच या चित्रपटाचं आणि या कथेचं खरं सार आहे.

शिक्षणासाठी कधीच उशीर होत नाही! कोणत्याही वयात, कोणत्याही परिस्थितीत तुम्ही ज्ञानाची कास धरू शकता आणि आपलं आयुष्य उज्वल करू शकता.

**एक नवा सूर्योदय... आपण सारेच उदयकुमार!**

'आता थांबायचं नाय!' हा चित्रपट पाहिल्यानंतर आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा... आपल्या शहरात उदयकुमार शिरूरकर यांच्यासारखं काम करणारी व्यक्ती कोण असेल? आणि आपण त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासात कशी मदत करू शकतो?

# श्रावण महिन्यात घरी बनवा हे तीन चविष्ट गोड पदार्थ



यंदा श्रावण हा २५ जुलै रोजी सुरू होणार आहे. आपल्यापैकी बहुतेकजणांही श्रावणातील प्रत्येक सोमवार व शनिवार उपवास करतात. तर अनेकजण हे संपूर्ण श्रावण महिना उपवास करत असतात.

या श्रावण महिन्यात उपवासानंतर या तीन प्रकारचे गोड चविष्ट पदार्थ बनवा.

**मखाना मलाई खीर :** मखान्या पासून खीर बनवण्यासाठी एका पॅनमध्ये १ चमचा तूप गरम करा. त्यानंतर त्यात मखने टाकून मंद आचेवर ५ ते ७ मिनिटे कुरकुरीत होईपर्यंत तळा. मखाने थंड झाल्यावर ते बारीक करून घ्या, तुम्ही काही मखने अख्खे सोडू शकता. आता एका पॅनमध्ये दूध टाका. दूध उकळू लागले आणि ते थोडे घट्ट होईपर्यंत १० ते १५ मिनिटे शिजवा. त्यात भाजलेले आणि कुस्करलेले मखाना टाका. मंद आचेवर १० ते १२ मिनिटे शिजवा. एका लहान पॅनमध्ये एक चमचा तूप टाका आणि त्यात ड्रायफ्रुस भाजून घ्या. थंड झाल्यावर खीरमध्ये टाका. हवे असल्यास यात वेलची पावडर आणि केशर मिक्स करू शकता. आता त्यात तुमच्या चवीनुसार साखर टाकून ५ मिनिटे शिजू द्या. या दरम्यान खीर थोडी पातळ होऊ शकते, परंतु थंड झाल्यावर ती घट्ट होईल.

**साबुदाणा खीर केशर :** साबुदाणा केशर खीर ही चविष्ट गोड डिश बनवण्यासाठी, सर्वप्रथम साबुदाणा ५ ते ६ तास किंवा रात्रभर पाण्यात भिजवा. त्यानंतर २ चमचे गरम दूध घ्या आणि त्यात केशराचे धागे टाका आणि १० मिनिटे बाजूला ठेवा. गरजेनुसार दूध उकळत ठेवा. त्यात भिजवलेला साबुदाणा टाका. गॅस मंद आचेवर ठेवा १५ ते २० मिनिटे शिजवा. खीर घट्ट होईल. चवीनुसार साखर, वेलची पावडर आणि केशराचे दूध मिक्स करा. ड्रायफ्रूट्स देखील टाकू शकता. खीर काही मिनिटे शिजू द्या. तुमच्या आवडीनुसार गरम किंवा थंड सर्व्ह करा.

**शिंगाड्याचा हलवा :** एका पॅनमध्ये तूप गरम करा. त्यात शिंगाड्याचे पीठ टाका आणि ते मंद आचेवर सतत परतून घ्या. आता हळूहळू पाणी किंवा दूध टाका, मिश्रण थोडे घट्ट झाल्यावर त्यात साखर मिक्स करा. हवे असल्यास, वेलची पावडर आणि ड्रायफ्रुट्स मिक्स करू शकता. हे मिश्रण जेव्हा होईल हलके तूप सोडू लागते आणि बाजूंनी वेगळे होऊ लागते तेव्हा गॅस बंद करा आणि सर्व्ह करा. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अतिवृष्टी

महागडे बियाणे
भौ शेतात पेरले
मुसळधार पावसाने
सारे वाहून गेले...

विचारांचे ढग
मनात दाटले
भविष्याच्या चिंतेने
ह्रदय फाटले...!

दुबार पेरणीची
पडलीय चिंता
मदतीला कोणी
येईल का आता?

## वाचक लिहितात

### अधिवेशनाचे फलित काय?

मुंबईत सुरू असलेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा उद्या शुक्रवारी समारोप होतो आहे. पहिल्या दिवसापासूनच विरोधकांचा गोंधळ सुरू असून, सत्ताधारी कसेबसे हे अधिवेशन रेटून धरताहेत. ना कुठले मुद्दे, ना कुठले निर्णय. कोट्यवधीचा खर्च या अधिवेशनावर होतो. परंतु, त्यातून फलित काही निघत नाही. राज्यातील शेतकरी, बेरोजगारांच्या समस्या जशाच्या तशाच दिसतात. वर्षानुवर्षे हेच चित्र आहे. विरोधक मुद्दे मांडणार आणि सरकार आश्वासन देणार. कधी बदलणार हे चित्र?

■ सुरेशकुमार वासनिक, नागपूर.

### शहरातील वाहतुक कोंडीचा त्रास

नागपूर शहरात सर्वत्र उड्डाणपुल, मेट्रो, रस्त्यांचे रूंदीकरण अशी विकास कामे सुरू आहेत. शहराच्या विकासासाठी ही कामे गरजेची असली तरी योग्य नियोजनाअभावी या कामांमुळे वाहतुकीची कोंडी होत असून, सर्वसामान्य नागपूरकर आणि बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. संत जगनाडे महाराज चौक, अशोका चौक येथे रस्त्याच्या कडेलाच कंत्राटदार कंपनीची वाहने अस्ताव्यस्त उभी असतात. तेथून साधी मोटरसायकल काढणे कठीण आहे. कोंडी होते तेथे वाहतूक पोलीस कधीच दिसत नाही.

■ सौ. रत्नमाला हिवरकर, नागपूर.

# अस्मिता

## टी.व्ही. पाहताना

पॅरेंटिंग

मुलांचे डोळे इतर अवयवांप्रमाणेच कोमल असतात. खूप काम केल्याने इतर अवयव थकतात त्याचप्रमाणे डोळ्यांनाही क्षमतेपेक्षा जास्त काम करावं लागलं तर थकतात. मुलं बराच काळ टीव्ही पाहतात त्यावेळी त्यांच्या डोळ्यांच्या मांसपेशींवर प्रतिकूल परिणाम होतो. अनेकदा टीव्ही पाहताना अंधार केला जातो. टीव्ही पाहिल्यावर डोळे सामान्य प्रकाशात येतात त्यावेळी तो प्रकाश झेलता येत नाही. त्यावेळी डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप व्हायला लागते. मुलं अगदी जवळून टीव्ही पाहतात त्यावेळी डोळ्यांवर वाईट परिणाम होतो. असं होऊ नये यासाठी स्क्रीनपासून शक्य तितक्या लांबून टीव्ही पाहता येईल अशा ठिकाणी बैठक असावी. आजकाल घरामध्ये छोट्या आकाराच्या खोल्या असतात. त्यामुळे टीव्हीही छोट्या आकाराचा असावा. अनेकदा असं पहायला मिळतं की एखाद्या ठिकाणी एकाचवेळी अनेकजण बसून टीव्ही पाहत असतील तर मुलांना पुढे फरशीवर बसवून टीव्ही पहायला सांगितलं जातं. त्यामुळे त्यांना टीव्ही पहायला त्रास होतो. त्याचा परिणाम थेट मुलांच्या डोळ्यांवर होतो. खरंतर टीव्ही पाहताना प्रेक्षक आणि टीव्ही समान पातळीवर असायला हवेत. असं असेल तर डोळ्यांवर कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त दबाव येत नाही. टीव्ही पाहताना खोलीत अंधार करणं डोळ्यांना हानीकारक आहे. याचं कारण टीव्हीचा प्रकाश आणि वातावरणातील अंधार यामुळे जो विपरित प्रभाव निर्माण होतो त्यामुळे डोळ्यांवर अतिरिक्त दबाव येतो. त्यामुळे टीव्हीच्या प्रकाशाशिवायही खोलीत आणखी प्रकाश असेल याची काळजी घ्यावी. हा प्रकाश टीव्हीच्या स्क्रीनवर दिसता कामा नये किंवा तो प्रेक्षकांच्या डोळ्यांवरही येता कामा नये. टीव्ही पाहिल्याने त्रास जाणवत असेल तर काही गोष्टींची खबरदारी घ्यायला हवी. टीव्हीमध्ये कमी प्रकाश, फोकस, दिसण्यात, वाचण्यात अस्पष्टता, स्क्रीनवर पिक्चर हलत असेल अशा प्रकारची तक्रार असेल तर एखाद्या चांगल्या मेकॅनिककडून टीव्ही दुरुस्त करून घ्यावा. या दोषांचं त्वरीत निराकरण केलं नाही तर डोळ्यांना त्याचा सतत त्रास होत राहील. अशा त्रासामुळे डोळ्याची दृष्टीक्षमता कमी होण्याची शक्यताही असते. म्हणजे यामुळे आपल्याला अंधुक दिसायला लागतं. टीव्हीसेटमध्ये काही दोष नसतानाही टीव्ही पाहण्यास त्रास होत असेल तर त्वरीत एखाद्या नेत्ररोगतज्ज्ञाचा सल्ला घ्यावा. पाच वर्षांपर्यंतच्या मुलांचे डोळे फारच नाजूक असतात. त्यामुळे त्यांना शक्य तेवढ्या लांब बसून टीव्ही पाहण्याची सवय लावावी. मुलांना जास्त वेळ टीव्ही पाहू देऊ नये. खेळाकडे लक्ष वेधून टीव्हीची क्रेझ कमी करावी. मुलांसाठी असतात तेवढ्याच कार्यक्रमापुरताच त्यांना टीव्ही पाहण्याशी संबंध ठेवण्याचा प्रयत्न करावा.



## शुभ्राचं धवल यश

मानिनी

**मैरा फूड्स या कंपनीने मणीपूरमधल्या प्रत्येक घरात शिरकाव केला आहे. पॅकेज्ड फूड क्षेत्रातली ही कंपनी शुभ्रादेवी यांनी सुरू केली. २००४ मध्ये त्यांनी ही कंपनी सुरू केली. राजस्थानातल्या वनस्थली विद्यापीठातून फूड अँड न्यूट्रिशनमध्ये मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर शुभ्रा यांनी या कंपनीचा पाया रचला. मैरा फूड्सच्या माध्यमातून त्यांनी अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.**




मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आहे. ही समस्या सोडवण्याच्या कामी आपलाही खारीचा वाटा असावा या उद्देशाने शुभ्रादेवी यांनी मैरा फूड्स ही कंपनी सुरू केली. पॅकेज्ड फूड क्षेत्रातल्या या कंपनीची उत्पादनं आता मणिपूरमधल्या प्रत्येक घरात पोहोचली आहेत. २००४ मध्ये त्यांनी या कंपनीचा पाय रचला. पहिल्याच वर्षी या कंपनीची उलाढाल फक्त ३० हजार रुपये होती. २००५-०६ मध्ये हा आकडा एक लाख रुपयांवर पोहोचला. त्यानंतर त्यांच्या उत्पन्नात वाढ होत गेली. २०१२-१३ या वर्षात कंपनीची उलाढाल ७५ लाख रुपयांवर पोहोचली. आजघडीला कंपनीला एक कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळतं.

शुभ्रादेवी यांनी राजस्थानातल्या वनस्थली विद्यापीठातून फूड अँड न्यूट्रिशन या विषयात मास्टर्स पदवी मिळवली. गांधी विचारांचा पगडा असणाऱ्या शुभ्रादेवी यांना समाजासाठी काहीतरी करायचं होतं. राज्यातली बेरोजगारीची समस्या त्यांना दिसत होती. सुरुवातीच्या काळात त्यांनी एका डेव्हलपमेंट इन्स्टीट्यूटमध्ये प्रशिक्षण समन्वयक म्हणून काम केलं. पण नोकरीत त्यांचं मन रमत नव्हतं. त्यांना उद्योग करायचा होता. त्या माध्यमातून लोकांना नोकरी उपलब्ध करून द्यायची होती. अन्नप्रक्रिया उद्योगाशी संबंधित प्रशिक्षण त्यांनी पूर्ण केलं. त्यानंतर काही फळं आणून घरच्या घरी कँडी बनवायला सुरुवात केली. यासाठी त्यांनी काही स्थानिक महिलांना मदतीला घेतलं. या कँडी स्थानिक दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आल्या. २००४ मध्ये त्यांनी फक्त . एक हजार रुपये गुंतवणूक करून मैरा फूड्सचा पाय रचला. त्यावेळी त्यांच्या कंपनीत फक्त चार महिला कर्मचारी होत्या. मात्र शुभ्रादेवी यांनी प्रयत्नपूर्वक आपला व्यवसाय वाढवत नेला. आपल्या उत्पादनांच्या प्रसिद्धीसाठी त्यांनी विविध ठिकाणच्या प्रदर्शनांना भेटी दिल्या.

त्यांची कंपनी विविध प्रकारची लोणची, कँडी आणि खारवलेला सुकामेवा अशी उत्पादनं तयार करते. जवळपास ४५ उत्पादनांची निर्मिती ही कंपनी करते. विशेष म्हणजे मणीपूरमध्ये पिकणारी फळं, भाज्या आणि इतर घटकांचा वापर करून ही उत्पादनं तयार केली जातात. मणीपूरसह आसपासच्या राज्यांमध्येही त्यांची उत्पादनं विक्रीसाठी पाठवली जातात. उत्तर-पूर्वेकडच्या राज्यांमध्ये मैरा फूड्स हा मोठा ब्रँड आहे. शुभ्रादेवी यांचं यश अनेक महिलांना उद्योजगतेची वाट दाखवणारं ठरू शकेल. स्वयंसिद्धा होण्याचा मार्ग यातून नक्कीच गवसेल.

हेअर केअर

### शँपूने केस धुताना...



केसांचं सौंदर्य खुलवण्यासाठी आपण महागडे शँपू वापरतो. मात्र त्यांच्या चुकीच्या वापरामुळे केस खराब होतात. केसांमधला गुंता सोडवल्यानंतरच शँपूने केस धुवावेत. गुंतलेल्या केसांना शँपू लावला तर धुतल्यानंतरही ते विस्कटलेले दिसतील. कमीत कमी शँपू वापरणं गरजेचं आहे. साधारण अर्धा चमचा शँपू घेऊन त्यात पाणी मिसळा. त्यानंतर केसांना लावा. यामुळे शँपूची तीव्रता कमी होते. तसंच शँपू लावताना केस मागच्या बाजूलाच ठेवा. यामुळे ते गुंतणार नाहीत.

स्मार्ट टिप्स

### अशी चमकवा काचेची भांडी

वर्षानुवर्षं वापरात असणारी काचेची भांडी चमकवणं वैतागवाणं काम असतं. त्यातच ती खूप जपून धुवावी लागतात. काचेची भांडी स्वच्छ करण्यासाठी लिंबूमिश्रित पाण्याचा वापर करा. त्यामुळे भांडी छान चमकदार दिसतील. पाण्यात बेकिंग सोडा मिसळूनही ही भांडी धुता येतील. काचेच्या ग्लासची चमक टिकवण्यासाठी पाण्यात थोडीशी नीळ घाला. या पाण्याने ग्लास धुवा. मग हे ग्लास तांदूळ भिजवलेल्या पाण्यात बुडवून ठेवा.



लाईफस्टाईल

### ... म्हणून करा पेडिक्योर

पावलांची काळजी आपणच घ्यायला हवी. नियमित पेडिक्योर केल्याने पायांचं सौंदर्य खुलतंच शिवाय ते निरोगीही राहतात. या प्रक्रियेमुळे जंतूसंसर्गाचा धोका कमी होतो. नखांमधली घाण काढून टाकल्याने बॅक्टेरियांचा प्रादुर्भावही कमी होतो. यामुळे पावलांवरची मृत त्वचा निघून जाते. त्यामुळे महिलांनी नियमित पेडिक्योर करण्यावर भर द्यावा.



## नैसर्गिक बॉडी लोशन

ब्युटी टॉक

फळांमधली जीवनसत्त्वं आणि इतर पोषक घटकांमुळे त्वचा नितळ आणि मुलायम बनते. म्हणूनच त्वचेचा तजेला जपण्यासाठी फळं खाण्याचा सल्ला दिला जातो. फळं खाल्ल्यामुळे आरोग्य उत्तम रहातं. त्याप्रमाणे फळांपासून तयार केलेल्या बॉडीलोशनमुळे त्वचा तजेलदार दिसते. फळांचं हे बॉडी लोशन तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता. ते बनवण्याची कृती जाणून घेऊ.



फ्रूट बॉडीलोशन बनवण्यासाठी अर्धा कप मँगो बटर, अर्धा कप खोबरेल तेल, प्रत्येकी एक चमचा पपई, डाळिंब आणि पॅशन फ्रूटच्या बियांचं तेल, इसेन्शियल ऑईलचे दहा थेंब, ५ थेंब व्हाय लँग व्हाय लँग इसेन्शियल ऑईल हे साहित्य घ्या. सर्वात आधी कढईत मँगो बटर वितळवून घ्या. यात खोबरेल तेल घालून मंद आचेवर ठेवा. गॅस बंद करा. मिश्रण गार झाल्यावर दहा मिनिटं फ्रीजमध्ये ठेवा. हे मिश्रण थोडं घट्ट होईल. या मिश्रणात फळांच्या बियांची तेलं आणि इसेंशियल ऑईल घाला.

हे सर्व घटक एकत्र करून घट्ट मिश्रण तयार करा. हे मिश्रण म्हणजे तुमचं फ्रूट बॉडी लोशन. यानंतर एका डबीत हे मिश्रण भरून ठेवा. याच्या नियमित वापरामुळे त्वचा छान नितळ आणि मुलायम होईल. घरी तयार केलेल्या या लोशनमध्ये केमिकल्स नसतील. त्यामुळे त्याचा वापर अगदी बिनधास्त करता येईल. विकतच्या बॉडी लोशनपेक्षा हे स्वस्तही पडेल.

## पालक पनीर रोल

रसगंधा

शाळा सुरू झाल्यानंतर मुलांच्या डब्याचा प्रश्न आ वासून उभा असतो. नेहमीच्या पोळीभाजीचा कंटाळा येतो. अशा वेळी चविष्ट आणि आरोग्यदायी रेसिपीच्या शोधात असाल तर पालक पनीर रोलचा चांगला पर्याय तुमच्याकडे आहे.

**साहित्य:** एक कप गव्हाचं पीठ, अर्धा कप पालक प्युरी, एक बारीक चिरलेली मिरची, अर्धा चमचा जिरेपूड, चवीनुसार मीठ आणि तेल.

**स्टफिंगसाठी :** १५० ग्रॅम किसलेलं पनीर, दोन मिरच्या बारीक चिरून घ्या, चार लसूण पाकळ्यांचे छोटे तुकडे करा, एक चिरलेला कांदा, बारीक चिरलेली कोथिंबिर, एक चिरलेला टॉमेटो, अर्धा चमचा लाल तिखट, चमचाभर गरम मसाला, चिमूटभर हळद, चार चमचे टॉमेटो पास्ता सॉस, चार चमचे मस्टर्ड सॉस, मीठ

कृती: पालक प्युरी, जीरेपूड आणि मीठ घालून पीठ मळून घ्या. मळताना थोडं तेल घाला. कणकेचे छोटे गोळे तयार करून पोळीप्रमाणे लाटून आणि भाजून घ्या. आता पनीरची बुर्जी बनवायची आहे. यासाठी कढईत थोडं तेल गरम करून कांदा परतून घ्या. मग लसूण, मिरच्या आणि टॉमेटो घाला. टॉमेटो शिजल्यानंतर तिखट, गरम मसाला आणि हळद घाला. हलवून घ्या. शेवटी त्यात पनीर आणि चवीनुसार मीठ घालून शिजवा. गॅस बंद करा. वरून टोमॅटो पास्ता सॉस, मस्टर्ड सॉस आणि कोथिंबिर घालून मिश्रण तयार करा. आता पालक पराठ्यावर हे स्टफिंग पसरा. रोल करा आणि सॉससोबत डब्यात द्या.



## पाळी का चुकते?

हेल्थ टॉक




मासिक पाळी चुकण्यामागे प्रत्येक वेळी गर्भधारणा हेच कारण असतं असं नाही तर सध्या जीवनशैलीतले बदलही याला कारणीभूत ठरू लागले आहेत. आपली एखादी चुकीची सवय मासिक पाळीवर परिणाम करू शकते. पाळी चुकण्याच्या विविध कारणांचा हा आढावा...

* धकाधकीच्या जीवनामुळे महिलांवरचा ताण प्रचंड वाढला आहे. शरीरात ताणाचे हार्मोन्स वाढले की त्याचा परिणाम इतर हार्मोन्सवर होतो. स्ट्रेस हार्मोन्स मासिक पाळीच्या चक्रावर परिणाम करू शकतात.
* गर्भनिरोधक गोळ्यांमुळे शरीरात बरेच बदल होतात. या गोळ्यांच्या प्रभावाशी जुळवून घ्यायला शरीराला थोडा वेळ लागतो. अशा गोळ्या घेणाऱ्या महिलांच्या पाळीचं चक्र बिघडू शकतं.
* मासिकपाळीसाठी शरीराला ऊर्जेची गरज लागते. ऊर्जेच्या कमतरतेमुळे पाळीचं चक्र बिघडू शकतं. त्यामुळे अंगमेहनत करणाऱ्या किंवा गरजेपेक्षा अधिक व्यायाम करणाऱ्या महिलांची मासिक पाळी अनियमित होऊ शकते.
* पॉलिसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम म्हणजे पीसीओडीची समस्या बरीच वाढते आहे. या विकारामुळे मासिक पाळी अनियमित होते.
* काही औषधांच्या सेवनामुळेही तुम्हाला त्रास होऊ शकतो.
* अचानक वजन वाढलं किंवा कमी झाली तरी मासिक पाळी प्रभावित होऊ शकते.
* थायरॉइड तसंच स्थूलपणामुळेही पाळी पुढे जाते किंवा काही काळासाठी बंद होऊ शकते.

## परावलंबी होऊ नकोस!

समुपदेशन



मी २६ वर्षांची तरुणी असून मध्यंतरी नैराश्यातून बाहेर पडले. गेली दोन वर्षे मला नैराश्याने ग्रासलं होतं. यामुळे मी खूप अंतर्मुख आणि थोडी हळवीही झाले आहे. माझी खूप जवळची मैत्रीण मधल्या काळात माझा आधार बनली होती. या परिस्थितीतून बाहेर पडायला तिची खूप मदत झाली. पण आता ती मला गृहित धरू लागली आहे. ती मला अधूनमधून संपर्क करते. तिच्या वागणूकीमुळे माझी अस्वस्थताही खूप वाढली होती. मीच तिच्या आयुष्यातली सर्वात महत्त्वाची व्यक्ती असल्याचं तिचं म्हणणं आहे. पण ती मला इतरांप्रमाणेच वागवत असल्याचं मला वाटतं. मी तिला अनेकदा घरी येण्याचं आमंत्रण दिलं. पण काहीतरी कारण सांगून तिने ते टाळलं. मी या सगळ्या गोष्टींचा खूप विचार करते आहे का, भावनिकदृष्ट्या इतरांवर अवलंबून राहू लागले आहे का, मला मार्गदर्शन करा.

- तुझं या मैत्रिणीशी भावनिक नातं निर्माण झालं आहे. यात काहीच चूक नाही. पण भावनेचा अतिरेक होता कामा नये. मला वाटतं तू तिला स्पेस द्यायला हवी. सामाजिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचा प्रयत्न कर. स्वत्त्व जप. भावनिकदृष्ट्या परावलंबी होऊ नकोस. तिच्या आयुष्यातल्या तुझ्या महत्त्वाबद्दल मनात अजिबात किंतू बाळगू नकोस. नव्या गोष्टी शिक. छंदांकडे लक्ष दे. लोकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न कर. स्वतःला पहिलं प्राधान्य दे. इतरांच्या वागण्यामुळे स्वतःचं महत्त्व कमी होऊ देऊ नकोस. गरज वाटली तर समुपदेशकांची मदत घे.

## ट्रेंडी व्हाईट डेनिम्स

स्टाईल स्टेटमेंट




डेनिम्स म्हणलं की निळ्या रंगाच्या शेड्स आपल्या डोळ्यांपुढे येतात. गडद निळा, फिकट निळा, शेडेड अशा जीन्सची चलती असते. सर्वसाधारणपणे ब्लू जीन्सलाच पसंती दिली जाते. मात्र तुम्ही व्हाइट जीन्सही कॅरी करू शकता. या रंगातही तुम्हाला भरपूर व्हरायटी बघायला मिळते. तुमच्या आवडीनुसार नॉर्मल बॉटम, बॉयफ्रेंड फिट, स्कीनी, अँकल लेंथ यापैकी कोणत्याही प्रकारची जीन्स तुम्ही निवडू शकता. व्हाइट जीन्सवर तुम्ही कोणत्याही रंगाचा टॉप घालू शकता. वेगवेगळ्या प्रिंट्सचं कॉम्बिनेशन करता येईल.

व्हाईट जीन्स घालण्याचं तंत्र तुम्हाला जमायला हवं. ही जीन्स योग्य पद्धतीने कॅरी केली तर खूपच स्टायलिश दिसते. सकाळी स्कीनी व्हाइट जीन्सवर पांढरा किंवा पेस्टल रंगाचा टॉप घालता येईल. संध्याकाळी गडद रंगाचे टॉप कॅरी करा. व्हाइट जीन्सवर ऑफ शोल्डर टॉप्स शोभून दिसतील. अशा टॉप्समुळे पेहरावाचं संतुलन साधलं जातं आणि तुमचा बांधाही छान दिसतो. पांढऱ्या जीन्सवर त्याच रंगाचा टॉप घालणार असाल तर त्यासोबत निऑन रंगांच्या अॅक्सेसरीज कॅरी करा. स्नीकर्स, डँगलर्स, क्लच यापैकी काहीही चालून जाईल. व्हाइट डेनिमचे मिनी स्कर्टही उठून दिसतात. हा प्रकार सध्या ट्रेंडमध्ये आहेत. त्यामुळे जीन्स आणि स्कर्ट यापैकी कोणत्याही पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

## बदली निमित्त नव्या ठिकाणी जाताना...

स्कील डेव्हलपमेंट

पतीची नोकरीत बदली झाली किंवा परदेशात जाण्याची संधी मिळाली तर कुटुंबासाठी महिलांना नोकरी सोडावी लागते. नाईलाजास्तव अनेकींना करिअरचा त्याग करावा लागतो. मात्र या कारणामुळे काम थांबवण्याची काहीच गरज नाही. इंटरनेटमुळे आज अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. कंपन्याही कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार किंवा सोयीनुसार काम करण्याची मुभा देतात. विविध कंपन्या देशाविदेशात शाखा उघडतात. त्यामुळे आपलं करीअर संपलं असा समज करून घेण्याची आवश्यकता नाही. पतीच्या बदलीनंतरही आपलं करीअर सुरू ठेवण्यासाठी काय करायला हवं याविषयी...



* बदलीच्या ठिकाणाबद्दल शक्य तितकी महिती काढा. परदेशात बदली झाली असेल तर जोडीदाराला कामाचा परवाना मिळण्याची तरतूद आहे किंवा नाही याची खातरजमा करून घ्या. तिथल्या कामाच्या नियमांबद्दल जाणून घ्या. सध्याच्या पदाशी किंवा कामाशी मिळत्याजुळत्या संधींचा शोध घ्यायला सुरुवात करा. लिंक्ड इन किंवा इतर साईट्सचा आधार घ्या.
* देशांतर्गत बदली असेल तर तुम्ही कंपनीकडे दूरस्थ कर्मचाऱ्यांप्रमाणे काम करण्याच्या संधीबाबत विचारणा करू शकता. बहुराष्ट्रीय कंपनीत काम करत असाल तर परदेशात त्यांची शाखा असू शकते. तिथल्या बदलीबाबत विचारणा करा. या प्रक्रियेत थोडा त्रास होऊ शकतो. पण करीअरवर पाणी सोडण्यापेक्षा थोडा त्रास सहन करणं केव्हाही चांगलं.
* तुमची सध्याची नोकरी सुरू ठेवण्याचा कोणताही पर्याय नसेल तर नेटवर्किंगचा मार्ग निवडा. परदेशात बरेच भारतीय असतात. त्यांच्याशी संपर्क साधा. तुम्हाला नवी नोकरी शोधावी लागेल. या कामात त्यांची मदत होईल.
* शीरोज, जॉब्स फॉर हर, रिलाँचर अशी वेब पोर्टल्स तुमच्या कामी येतील. ही जॉब पोर्टल्स खास महिलांसाठी तयार करण्यात आली आहेत. करीअरच्या नव्या वाटा धुंडाळताना त्यांची मदत घेता येईल.

## गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरीत
# थेट ५ टक्के आरक्षण



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**
गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारक विद्यार्थ्यांना शासकीय नोकरीच्या निवड प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर अखेर तोडगा निघाला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांच्या पुढाकाराने आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांच्याशी मंत्रालयात झालेल्या विशेष बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

गोसीखुर्द प्रकल्प व्हावा, यासाठी अनेकांनी आपल्या शेतजमिनी दिल्या. शेतजमिनी आणि घरांच्या मोबदल्यासोबत विशेष पॅकेज म्हणून शासकीय नोकरी-उच्च शिक्षणासाठी पाच टक्के आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी गोसीखुर्द प्रकल्पबाधित असल्याचे प्रमाणपत्रही देण्यात आले होते.

याचा लाभ २०२२-२३ पर्यंत अनेकांनी घेतला. मात्र २०१५ मधील शासन आदेशानुसार हा लाभ देता येत नाही, असे सांगत प्रकल्पग्रस्तांना सर्व सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले होते. मात्र आता गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरीत ५% आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

गोसीखुर्द प्रकल्पासाठी ११९९ कोटींच्या विशेष आर्थिक पॅकेजला मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती. या पॅकेजअंतर्गत काही प्रकल्पग्रस्त कुटुंबांनी पुनर्वसनाऐवजी २.९० लाख रुपयांचा मोबदला स्वीकारला होता. यामुळे संबंधितांच्या प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत अडथळे निर्माण होत होते आणि ५ टक्के आरक्षणाच्या लाभापासून ते वंचित राहत होते.

ही बाब लक्षात घेऊन पालकमंत्री संजय सावकारे यांनी पाठपुरावा केला. या निर्णयामुळे गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त आता ५ टक्के समांतर आरक्षणांतर्गत शासकीय नोकरीच्या स्पर्धेत पात्र ठरणार आहेत.

त्यांचा प्रकल्पग्रस्त दर्जा आणि त्या आधारे मिळणाऱ्या शासकीय नोकरीची पात्रता अबाधित राहणार आहे, असेही कळविण्यात आले आहे. हा निर्णय हजारो प्रकल्पग्रस्त तरुणांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.

# चार महिन्यात २२ वाघांसह ४० बिबटांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**
राज्यातील वाघांच्या मृत्यूची संख्या वाढतच चालली असून वर्षाच्या सुरुवातीलाच अवघ्या २० दिवसात १४ वाघांचा मृत्यू झाला.

जानेवारी ते एप्रिल २०२५ दरम्यान राज्यात २२ वाघ, ४० बिबटे आणि ६१ इतर वन्य प्राण्यांचा मृत्यू झाला. वनमंत्री गणेश नाईक यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान ही माहिती दिली. या धोक्यात असलेल्या आणि असुरक्षित प्राण्यांच्या संख्येत घट होण्याचे एक कारण शिकार आहे, असेही ते म्हणाले.

आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना नाईक यांनी वर्षाच्या सुरुवातीपासून वन्यजीवांच्या मृत्यूची सविस्तर माहिती सादर केली. या वर्षी मृत्यूमुखी पडलेल्या २२ वाघांपैकी १३ नैसर्गिक कारणांमुळे, चार विजेच्या धक्क्याने, चार रस्ते, रेल्वे आणि विहिरीतील अपघातात मृत्यूमुखी पडले, तर एका वाघाचा मृत्यू अद्याप अस्पष्ट आहे.

जानेवारी ते एप्रिल दरम्यान, राज्यात ४० बिबट्यांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यापैकी आठ नैसर्गिक कारणांमुळे, २० रस्ते, रेल्वे आणि विहिरींशी संबंधित अपघातांमुळे, तीन शिकारीमुळे मृत्युमुखी पडले आणि उर्वरित नऊ

**वन्यप्राण्यांचे मृत्यू थांबविण्याचे वनविभागासमोर मोठे आव्हान**



वाघांच्या मृत्यूचे कारण अद्याप ज्ञात नाही.

याव्यतिरिक्त, याच कालावधीत इतर ६१ वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला. त्यापैकी २३ जणांचा नैसर्गिक मृत्यू, चार जणांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू, चार जणांची शिकार आणि २४ जणांचा मृत्यू भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात किंवा विहिरीतील अपघातात झाला. सहा प्राण्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप अज्ञात आहे.

नाईक यांनी याच कालावधीत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात २१ जणांचा मृत्यू झाल्याला दुजोर देण्यात आला. जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२४ दरम्यान महाराष्ट्रात १०७ वाघांचा मृत्यू झाला. नाईक म्हणाले की, सरकार वाघ, बिबटे आणि इतर वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करत आहे. जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समितीच्या बैठकीत उपाययोजना आखल्या आहेत. विद्युत प्रवाहामुळे वाघ आणि इतर वन्य प्राण्यांचे मृत्यू रोखण्यासाठी कारवाई केली जात आहे. धनंजय मुंडे, संतोष दानवे, मनोज जमसुतकर आणि सुधीर मुनगंटीवार या आमदारांनी हा मुद्दा उपस्थित केला.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार, यावर्षी जानेवारीच्या पहिल्या २० दिवसांत भारतात १४ वाघांचा मृत्यू झाला, ज्यामध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक आठ वाघांचा मृत्यू झाला. यापैकी बहुतेक मृत्यू संरक्षित क्षेत्राबाहेर झाले आहेत, ज्याचे कारण शिकार, अपघात आणि संसर्गजन्य रोग आहेत.

त्याचवेळी, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अलिकडच्याच भारतातील वाघांच्या स्थिती अहवालात असे म्हटले आहे की महाराष्ट्रातील वाघांची संख्या आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांचे दर्शन वाढले आहे. मृत्यूंमध्ये वाढ झाल्याने वनविभागासमोर आव्हान निर्माण झाले आहे, ज्याने संरक्षित क्षेत्राबाहेर वाघांची सुरक्षा सुनिश्चित करावी, असेही त्यात नमूद आहे. वन्यप्राण्यांच्या वाढत्या मृत्यूवर केंद्रानेही चिंता व्यक्त केली होती.

## मनसे कार्यकर्त्यांची दुकानदाराला मारहाण

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ :**
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी मराठीच्या मुद्यावरून मुंबईत आणखी एका दुकानदाराला मारहाण केली आहे. दुकानदाराने सोशल मीडियावर मराठी लोकांबद्दल अपमानजनक पोस्ट टाकल्याचा आरोप या कार्यकर्त्यांनी केला आहे.



मनसे कार्यकर्ते विक्रोळी परिसरातील एका दुकानात पोहोचले आणि त्यांनी दुकानदाराला शिवीगाळ केली. त्यांनी दुकानदाराला धमकावले आणि त्याला माफी मागण्यास भाग पाडले इतकेच नाही तर परिसरात त्यांची धिंड देखील काढली.

## एमडी ड्रग्ज प्रकरणी मेडिकलच्या विद्यार्थ्यासह दोघांना अटक

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. १७ :**
एमडी ड्रग्ज विक्री करण्याचा प्रयत्नात असलेल्या दोघांना खदान पोलिसांनी अटक केली. त्यापैकी एक आरोपी बीएएमएसचे शिक्षण घेत आहे. तर दुसरा आरोपी त्याचा नातेवाईक आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी ४६ ग्रॅम ३० मिलिग्रॅम एमडी ड्रग्ज तसेच दोन दुचाकी, दोन मोबाइलसह एकूण ३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

मेडिकलचे शिक्षण घेत असलेला मोहम्मद यासिन मोहम्मद आसिफ (२३), रा. पंचगव्हाण, ह.मु. फिरदोस कॉलनी, गवळीपुरा, अकोला व मुश्ताक खान हादीक खान (४७), रा. गफुरवाला प्लॉट, अकोट अशी आरोपींची नावे आहेत.




खदान पोलिस ठाण्याचे ठाणेदार मनोज केदारे यांनी गोपनीय माहितीच्या आधारे आदर्श कॉलनी परिसरात छापा टाकला. मध्यरात्रीच्या सुमारास आरोपी दुचाकींवरून घटनास्थळी आले आणि व्यवहारासाठी तयारी करताच पोलिसांनी त्यांना घेराव घालून पकडले. मोहम्मद यासिन मोहम्मद आसिफ याची अंगझडती घेतली असता त्याचे फुल पँटचे खिशात एका प्लॅस्टिक कॅरीबॅगमध्ये गुंडाळलेला एमडी ड्रग्ज अंमली पदार्थ दिसून आला. त्याचे वजन केले असता ४६ ग्रॅम ३० मिलिग्रॅम होते.

पोलिस निरीक्षक मनोज केदारे म्हणाले की, ड्रग्ज अकोल्यात पकडले जाणे ही गंभीर व चिंतेची बाब आहे. आम्ही या घटनेचा कसून तपास करत आहोत. आरोपींनी हे ड्रग्ज कोठून आणले, त्यांना कुणी सहकार्य केले, या साखळीमध्ये आणखी कोण कोण आहे, हे तपासाअंती समोर येणार आहे.

## फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची गद्दारी मान्य नाही, आनंदराजांना विरोध

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :**
गेल्या ७० वर्षांच्या राजकारणात फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीने संविधानाबाहेरील विचार असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपसोबत कोणतीही युती केली नाही. मात्र, आता वंचित बहुजन आघाडी संविधानाच्या रक्षणासाठी 'आरापार'चा संघर्ष स्वीकारत असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळे यांनी याबाबत भूमिका मांडली.

मोकळे यांनी नमूद केले की, आरएसएस-भाजप हे सनातन वैदिक धर्माला प्राधान्य देतात, तर फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ ही संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या तत्त्वांवर आधारित आहे. त्यामुळे या दोन विचारसरणींमध्ये कोणताही समझोता शक्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

**आनंदराज आंबेडकरांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

सिद्धार्थ मोकळे यांनी यावेळी आनंदराज आंबेडकर यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, आनंदराज आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू असूनही, त्यांचे विचार संविधान बदलू पाहणा?्या आरएसएस-भाजपच्या दिशेने गेले आहेत. यापूर्वी वंचित बहुजन आघाडीने रिपब्लिकन सेनेच्या काही आंदोलनांना पाठिंबा दिला होता. मात्र, आता वंचितने स्पष्ट केले आहे की, अशा कोणत्याही पाठिंब्याची भूमिका त्यांनी यापुढे घेतलेली नाही.

मोकळे यांनी ठामपणे सांगितले की, कोणतीही संघटना जी संविधान बदलण्याच्या भाजप-आरएसएसच्या सहकार्याची भूमिका स्वीकारेल, ती फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची पाठिराखी मानली जाणार नाही. म्हणूनच, वंचितने आनंदराज आंबेडकर आणि रिपब्लिकन सेनेला विरोध करण्याचा निर्धार केला आहे.

**लोकरंजन**

: सिनेरंग :
## मेडिमिक्सची ब्रँड ॲम्बेसेडर अमृता खानविलकर




मेडिमिक्स भारतातील एक अग्रगण्य आयुर्वेदिक पर्सनल केअर ब्रँडने आपले मुख्य भौगोलिक क्षेत्रांमधील प्रादेशिक नाते बळकट करण्यासाठी आपली खेळी बदलताना अमृता खानविलकर या मराठमोळ्या अभिनेत्रीला नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे.

अमृता ही मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध अभिनेत्री असून ती, तिचे अष्टपैलुत्व, अभिजात लावण्य आणि सखोल सांस्कृतिक मुळ, यांच्यासाठी प्रसिद्ध आहे. रिॲलिटी शो मधील स्पर्धक ते प्रादेशिक चित्रपटसृष्टीतील सर्वात परिचित चेहऱ्यांपैकी एक, असा तिने प्रेरणादायी प्रवास केलेला आहे.

मेडिमिक्सचे स्वतःचे तत्त्वज्ञान म्हणजे, काळानुसार विकसित होत असताना नैसर्गिक क्षमता वाढवणे आणि परंपरेचे स्वागत करणे आहे. अमृताचा प्रेरणादायी प्रवास मेडिमिक्सचे तत्त्वज्ञान दर्शवित आहे. मेडिमिक्स आणि अमृता हे दोघे स्वस्थ त्वचेसाठी नैसर्गिक सौंदर्य, सांस्कृतिक नाते आणि आयुर्वेदाचे गुण, म्हणजे संपूर्ण मेडिमिक्स पोर्टफोलिओ श्रेणीसाठी स्किनफिटला आधार देण्याकरिता एकत्र आले आहेत आणि म्हणून या दोघांसाठी हा सहयोग एक महत्त्वाचा टप्पा आहे.

आपल्या नव्या भूमिकेबद्दल अमृता खानविलकर म्हणाली, मेडिमिक्स मला नेहमीच आपलेसे वाटले आहे.आणि आता तर मी अधिकृतपणे मेडिमिक्स कुटुंबाचा एक भाग बनले आहे. म्हणून मला विश्वास बसणार नाही इतके खास वाटत आहे.

हे फक्त एखाद्या ब्रँडची जाहिरात करण्यापुरते नसून हे माझ्या प्रवासात मला आधार देणाऱ्या लोकांना मी खरंच विश्वास केलेल्या गोष्टी सांगण्याविषयी आहे. नैसर्गिक घटक आणि आयुर्वेदाप्रती त्यांची बांधिलकी माझा स्वतःचा असा विश्वास दर्शविते की आपण आपल्या नैसर्गिक स्वभावाला स्वीकारले पाहिजे आणि त्वचेची सर्वात सौम्य आणि प्रभावी पद्धतीने काळजी घेतली पाहिजे.

■ ■ ■

## पाणी ठरला वर्षातील सर्वोत्कृष्ट चित्रपट

राजश्री एंटरटेनमेंटने आता पाणी या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला असून त्यांनी पर्पल पेबल पिक्चर्स आणि कोठारे व्हिजन प्रा. लि. यांच्या सहकार्याने पाणीची निर्मिती केली आहे.

राजश्री एंटरटेनमेंटचा हा पहिलाच मराठी चित्रपट असून त्यांनी पदार्पणातच इतिहास रचला आहे. आदिनाथ कोठारे दिग्दर्शित हा चित्रपट मराठवाड्याच्या जलदूत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हनुमंत केंद्रे यांच्या जीवनावर आधारित आहे. हा केवळ एक बायोपिक नसून समाजाला पाण्याचे महत्त्व पटवून देणारा एक सशक्त आणि संवेदनशील चित्रपट आहे. पाणीने आजवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार, विविध पुरस्कार सोहळ्यांमध्ये २५ मानाचे पुरस्कार पटकावले आहेत.

यामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक अशा प्रमुख विभागांचा समावेश आहे. या यशामुळे पाणी हा चित्रपट वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेला मराठी चित्रपट ठरला आहे.

चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच या चित्रपटाला 'पर्यावरण संरक्षण/संरक्षणावरील सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म'साठी '६६ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार' देण्यात आला. तर न्यूयॉर्क फिल्म फेस्टिवलमध्ये आदिनाथ




कोठारे याला सर्वोत्कृष्ट कलाकाराचा पुरस्कार मिळाला. नुकत्याच झालेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात 'पाणी' ला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट, पटकथा, सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट साऊंड डिझाईन, सर्वोत्कृष्ट बॅकग्राऊंड स्कोअर या विभागात पुरस्कार मिळाले. आदिनाथ कोठारे दिग्दर्शित 'पाणी' चित्रपटात आदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी, विकास पांडुरंग पाटील अशी तगडी स्टारकास्ट आहे.

■ ■ ■

## 'तू धडकन मैं दिल'.. स्टार प्लस वर



स्टार प्लस वाहिनीवर 'तू धडकन मैं दिल' ही एक नवी भावस्पर्शी मालिका सुरू होत आहे. या मालिकेत दिल नावाच्या लहानगीचा प्रवास रेखाटण्यात आला आहे. ही व्यक्तिरेखा बाल कलाकार आराध्या पटेल साकारत आहे, जिची निरागसता आणि अभिनय मालिकेत रंगत आणतो.

अलीकडे प्रदर्शित झालेल्या प्रोमोमध्ये, दिल एका वर्दळीच्या रस्त्याच्या मध्यभागी पिशवी घेऊन एका मांजरीचा पाठलाग करते आहे. ढगांच्या गडगडाटांसह मुसळधार पाऊस पडत असताना, दिल तिच्या हरवलेल्या आईबद्दल बोलते, ती तिच्या आईचा फोटो हृदयाशी घट्ट धरून बसली आहे. तिला आशा आहे की, एकदा पाऊस थांबला की तिला तिचे आई आणि बाबा सापडतील.

आणखी एका भावव्याकुळ क्षणी, दिल एका कुटुंबाला एकत्र खाताना बघते. ते बघताना तिच्या डोळ्यांतून एकाकीपण प्रतिबिंबित होताना दिसते, तरीही मागे हटण्याऐवजी, ती तिच्या पिशवीतून खाणे बाहेर काढते आणि तिच्या शेजारी बसलेल्या मांजरीसोबत तो खाऊ प्रेमाने शेअर करते. या साध्या कृतीतून तिचा काळजी घेणारा स्वभाव दिसून येतो. दिल एक आशादायी मुलगी आहे. ठाम आणि धाडसी आहे आणि सोबतच प्रचंड आशावादी आहे. प्रोमोमधली प्रत्येक, फ्रेम आपल्या उपस्थितीने तिने उबदार आणि जिवंत केली आहे.दर सोमवारी संध्याकाळी ७ वाजता स्टार प्लस वाहिनीवर 'तू धडकन मैं दिल' ही मालिका पाहायला विसरू नका.


■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## शिक्षकाच्या जबाबदारीतून सफाई कर्मचारी मुक्त
### मुख्याधिकाऱ्यांनी केला बदली आदेश रद्द : पुलगाव नगर परिषदेतील प्रकार

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १७ :**
वर्धा जिल्ह्याच्या पुलगाव नगर परिषदेत स्वच्छता विभागात सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याला प्राथमिक शाळेत शिकविण्याची जबाबदारी देण्यात आली.

नगर परिषद सीईओची स्वाक्षरी असलेलं आदेशाचं पत्र सफाई कर्मचाऱ्याच्या घरी पोहचलं. पत्र वाचून सफाई कर्मचारी देखील आवाकं झाला. आधीच नगर परिषद शाळांची अवस्था बिकट असताना पुलगावच्या नगर परिषदेतील शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला. आता मात्र नगर परिषद प्रशासनाने सारवा सारव करीत क्लिरीकल चूक झाल्याचे सांगत हा आदेश रद्द केला आहे.


नगरपरिषद पुलगांव, जिल्हा-वर्धा
(Clerical Mistake)

नगर परिषदेच्या स्वच्छता विभागात चेतन चांडाले हा सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. पण याच सफाई कर्मचाऱ्याला पुलगाव येथील नगर परिषद अंतर्गत येत असलेल्या शहीद भगतसिंग प्राथमिक शाळेत शिकविण्याचा आदेश नगर परिषदेच्या शिक्षण विभागाने काढला. सदर पत्रावर मुख्याधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेतली गेली.

याबाबत कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिला जाणार नसल्याचे देखील पत्रात नमूद करण्यात आले. पण मुळच्या स्वच्छता विभागात कार्यरत असणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्याला अशी शिक्षण सेवकाची जबाबदारी दिल्याने खडबळ उडाली. ही जबाबदारी तात्पुरती जरी असली तरी याकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. बारावीनंतर बी ए चे दुसरे वर्ष पूर्ण केले. शहीद भगत सिंग प्राथमिक शाळेतुन बदलून गेलेल्या शिक्षकाच्या जागेवर स्वच्छता कर्मचाऱ्याची नियुक्ती झाली. आपल्याला घरी पत्र आणून दिले, पण कुठलाही शिकविण्याचा अनुभव मला नाही आणि मी शिकवू देखील शकत नसल्याचे सफाई कर्मचारी चेतन चांडाले याने सांगितले आहे.

या प्रकरणात नगर परिषद प्रशासनाने आता सारवासारव करीत मुख्याधिकाऱ्यांनी काढलेला आदेश रद्द केला आहे.. या प्रकरणाने मात्र नगर परिषदच्या शिक्षण विभागात सावळा गोंधळ असल्याची बाब मात्र समोर आली.

पुलगावच्या शिक्षण विभागात सफाई कर्मचाऱ्यांचा आदेश निघाला तेव्हा शाळेचे मुख्यधापक सतीश राखूडे हे देवळी येथे ट्रेनिंग वर गेले होते. त्यांना या मुख्यधिकाऱ्याच्या आदेशाबद्दल माहीत नाही, माज्या पश्चात हा आदेश आल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा यांनी सदर बाब ही शिक्षण विभागाकडून क्लिरीकल चूक झाल्यामुळे सांगितले आहे. असे असताना देखील नपच्या शिक्षण विभागात मात्र काहीतरी गौडबंगाल असल्याची चर्चा नपच्या आवारात होती. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री,वर्ध्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्या जिल्ह्यात हे धक्कादायक वास्तव पुढे आले आहे.

## गुटखाबंदीसाठी मकोका अंतर्गत कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ :**
राज्यात गुटखा तस्करी आणि विक्रीला खतपाणी देणा?या गुन्हेगारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई केली जाईल. विधी व न्याय विभागाचे यासंदर्भात अभिप्राय विचारात घेण्यात येईल, अशी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत दिली.

राज्यात गुटखा बंदी, पान मसाला उत्पादन विक्री आणि वितरणावर बंदी असतानाही सर्रासपणे विकी केली जाते. महाराष्ट्राच्या कानाकोप?यात म्हणजे एसटी स्टॅण्डपासून ते अगदी पर्यटन ठिकाणी गुटख्याचे पाकिटे मिळतात. टपरीपासून ते वरपर्यंत या गुटखा विकणाऱ्यांचे मोठे नेटवर्क आहे. सरकारकडून फक्त विकणाऱ्यावर कारवाई होते. परंतु, हा गुटखा येतो कुठून, त्यामागे कोणाचा आशीर्वाद आहे, असा सवाल आमदार श्रीकांत भारतीय यांनी विचारला.

मंत्री झिरवाळ यांनी त्यावर माहिती देताना, आतापर्यंत राज्यभरात ४५० कोटींपेक्षा अधिक किमतीचा गुटखा व संबंधित साठा जप्त केला आहे. १० हजारांहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत, असे सभागृहाला सांगितले.

# 'त्या' अण्णाच्या घरासमोर भरतो तळीरामांचा बाजार

■ **महासागर प्रतिनिधी**
**देसाईगंज, दि. १७ :**
अतिदुर्गम, अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्ह्यात २ ऑक्टोबर १९९२ पासुन दारुबंदी लागु आहे. मात्र गडचिरोली जिल्ह्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या देसाईगंज शहरातील वर्दळीच्या मार्गावर असलेल्या त्या अण्णाच्या घरासमोर चक्क तळीरामांचा बाजार भरवल्या जात असतांना संबंधित विभागाचे अधिकारी मात्र बघ्याच्या भुमिकेत असल्याने याबाबत सखेद आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

देसाईगंज शहराच्या माता वार्डातील सर्रास दारू विक्री चव्हाट्यावर आल्यानंतर येथील नागरीकांनी दारूबंदीसाठी केलेले अथक परिश्रम अखेर कामात आले असले तरी दारूबंदी जिल्हात दारुबंदीसाठी करावी लागणारी पायपीट एकुणच प्रशानाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह उपस्थित करू लागले आहे. देसाईगंज शहराच्या अनेक वार्डात अशीच सर्रास दारू विक्री सुरु असुन दारूबंदीसाठी आवाज उठवणारे दारू विक्रेत्यांचे टार्गेट ठरत आहेत.

वार्डातील लोकांनी आपल्या वार्डातील दारुबंदीसाठी संबंधित विभागाला अर्ज सादर केले असता समस्त दारु विक्रेत्यांना यथाशिघ्र माहिती दिल्या जात असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तक्रारदार आणि अवैध दारू विक्रेत्यांत यावरून शाब्दिक बाचाबाची देखील झाल्याचे सांगीतले जात आहे.

शहराच्या मुख्य बाजारपेठेत मागील काही वर्षांपासून सर्रास दारू विक्री सुरु असतांना याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याने अवैध दारू विक्रेत्यांना संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनीच दारू विक्रिचा अलिखित परवाना तर दिला नाही ना? या चर्चेला आता चांगलेच उधाण येऊ लागले आहे.

दरम्यान शहराच्या कस्तुरबा वार्डातील रहदारीच्या मुख्य मार्गालगतच असलेल्या कथीत अण्णाच्या घरी अलिखित परवाना दिल्यागत सर्रास बार सारखेच सर्वच सोपस्कार पार पाडल्या जात असल्याने संध्याकाळच्या सुमारास या मार्गावर तळीरामांची वर्दळ राहात असल्याचे पाहावयास मिळत आहे. सदर तळीराम मुख्य मार्गावर गाड्या ठेवून मदिरा प्राशन करण्यात व्यस्त असता वाहतुक दारांनी वाहने न्यावे कुठून अशी समस्या निर्माण झाली असता याबाबत मार्ग काढण्यास सांगावयास गेलेल्यास पाहून घेण्याची धमकी दिली जात आहे.

जिल्ह्यातील गोरगरीबांचे जीवनमान उंचावण्यासाठी लागू करण्यात आलेली दारूबंदीच आता अनेकांच्या जीवावर उठू लागल्याचे धक्कादायक वास्तव असतांना संबंधित विभागाचे अधिकारी मात्र कथित अण्णाची दारू बंद करण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने पाणी कुठेतरी मुरत असल्याच्या शंकेला दुजोरा मिळत असून वरिष्ठांनी येथील गंभीर समस्येची दखल घेऊन यथाशिघ्र दारुबंद करण्याचे आदेश द्यावेत,अशी मागणी जोर धरू लागली आहे. याबाबत वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.